अतारांकित प्रश्नोत्तरांची ३७ वी यादी

# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### मौजे गावडेवाडी हे गाव शिंदेवाडी ग्रामपंचायती ऐवजी शिरवळ (ता.खंडाळा,जि.सातारा) या ग्रामपंचायतीमध्ये समाविष्ट करणेबाबत

**(१) १३४ (१६-०४-२०२५). श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे गावडेवाडी हे गाव शिंदेवाडी ग्रामपंचायती ऐवजी शिरवळ (ता.खंडाळा, जि.सातारा) या ग्रामपंचायतीमध्ये समाविष्ट करण्याचा प्रस्ताव गटविकास अधिकारी, पंचायत समिती, खंडाळा यांनी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) जिल्हा परिषद, सातारा यांचेकडे माहे जानेवारी, २०२३ मध्ये सादर केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रस्ताव हा जिल्हा परिषद सातारामार्फत विभागीय आयुक्त, पुणे यांनी ग्रामविकास विभाग मंत्रालय यांचेकडे माहे ऑक्टोबर, २०२४ मध्ये पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रस्तावाबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, त्याअनुषंगाने सदर प्रस्तावास तत्काळ मंजूरी देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे (२४-०२-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रस्ताव विभागीय आयुक्त, पुणे यांच्याकडून दिनांक २३/०४/२०२५ रोजी ग्रामविकास विभागास प्राप्त झाला.

(३) मौजे गावडेवाडी हे गाव शिंदेवाडी ग्रामपंचायती ऐवजी शिरवळ ग्रामपंचायतीमध्ये समाविष्ट करण्याबाबतची शासन अधिसूचना दिनांक ०४/११/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### माजलगाव (जि.बीड) येथील ग्रामीण रुग्णालयाची झालेली दूरवस्था

**(२) ७९७ (३०-०४-२०२५). श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माजलगाव (जि.बीड) येथील ग्रामीण रुग्णालयाची इमारत ही निजामकालिन वास्तू असून सदर इमारतीस साठ वर्षांपेक्षा जास्त कालावधी झाल्याने ही इमारत मोडकळीस व जीर्ण होण्याच्या मार्गावर

असल्याचे माहे जानेवारी, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या इमारतीत पावसाळ्यामध्ये जागोजागी गळती होत असल्याने मोठी दुर्घटना होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार माजलगाव शहरापासून तीन किलोमीटर अंतरावर उभारण्यात येणाऱ्या नवीन इमारतीचे बांधकाम तातडीने पूर्ण करून रुग्णांना व कर्मचाऱ्यांना पुरेशा सोयी सुविधा देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर (०७-०४-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
सदर छतगळती दुरुस्तीचे संपूर्ण कामे वेळोवेळी करण्यात आलेली आहेत.
(३) माजलगाव (जि.बीड) येथील ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयाचे ५० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करण्यास मान्यता दिलेली असून सदर श्रेणीवर्धीत ९५ खाटांच्या नवीन उपजिल्हा रुग्णालयाचे बांधकाम प्रगतीपथावर असून सद्य:स्थितीत ५० टक्के काम पूर्ण झालेले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मौजे घाडगेवाडी (ता.खानापूर, जि.सांगली) तसेच अन्य काही गावांनी नवीन ग्रामपंचायत स्थापन करण्याच्या मागणीबाबत

**(३) ११२४ (२४-०४-२०२५). श्री.सुहास बाबर (खानापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे घाडगेवाडी (ता. खानापूर, जि.सांगली) तसेच अन्य काही गावांनी नवीन ग्रामपंचायत स्थापन करण्याची मागणी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ग्रामपंचायत स्थापन झाल्यास नागरिकांची होणारी गैरसोयी सोडविण्यात मोठया प्रमाणात मदत होईल, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त मागणीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले त्याअनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे (२४-०२-२०२६) :** (१) होय, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सांगली यांच्याकडे प्रस्ताव सादर करण्यात आले आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) मौजे घाडगेवाडीची लोकसंख्या ४८९ इतकी असल्याने शा.नि. व्हीपीएम २६०३/प्र.क्र. १५४४/पंरा-४ (२२), दिनांक १२ फेब्रुवारी, २००४ नुसार मौजे घाडगेवाडीचा प्रस्ताव लोकसंख्या निकष पूर्ण करत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्य महिला आयोगाकडे तीन वर्षात दाखल झालेली महिला अत्याचाराची प्रकरणे निकाली काढण्याबाबत

**(४) १८७९ (२४-०४-२०२५). डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य महिला आयोगाकडे तीन वर्षात महिला अत्याचाराची हजारो प्रकरणे दाखल होत असून सदरहू प्रकरणे मनुष्यबळ, निधी व सामग्रीअभावी निकाली काढणे शक्य होत नसल्याचे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेवून सदरील प्रकरणे तातडीने निकाली काढण्यासाठी कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे (०५-०३-२०२६) :** (१) महाराष्ट्र राज्य महिला आयोग कार्यालयात माहे एप्रिल, २०२२ ते मे, २०२५ अखेरपर्यंत एकूण ४८५२५ तक्रारी प्राप्त झाल्या असून, त्यापैकी ३७१४७ प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत. उर्वरीत प्रकरणांवर कार्यवाही सुरु आहे.

महाराष्ट्र राज्य महिला आयोग कार्यालयाकरिता ३५ पदे मंजूर आहेत. सदर मंजूर पदांपैकी १८ पदे नियमित स्वरुपात भरलेली असून उर्वरीत १७ पदे कंत्राटी पद्धतीने भरण्यात आली आहेत. सद्य:स्थितीत आयोगातील कोणतेही पद रिक्त नाही. तसेच, महाराष्ट्र राज्य महिला आयोगाकरिता सन २०२४-२५ या वित्तीय वर्षासाठी ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) या उद्दिष्टाकरिता रु.३४९.५० लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आला असून सदर निधी सन २०२४-२५ मध्ये खर्च करण्यात आला आहे.

(२) महिला आयोग आपल्या दारी या उपक्रमातून माहे डिसेंबर २०२१ ते माहे मे २०२५ पर्यंत ३५ जनसुनावण्यांचे आयोजन करण्यात आले असून, त्याव्दारे ३७२२ तक्रारींवर कार्यवाही करण्यात आली आहे. तसेच, तेथील महिलांच्या समस्या स्थानिक पातळीवर सोडविण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. याशिवाय महिला आयोग कर्यालयात ई-मेल, समुपदेशन, हेल्पलाईन व Legal Aid Clinic व्दारे तक्रारी सोडविल्या जातात. दिनांक ०१ एप्रिल, २०२४ पासून माहे मे, २०२५ दरम्यान हेल्पलाईन व्दारे १७७६ तक्रारी प्राप्त झाल्या व त्यातील सर्व १७७६ तक्रारींवर कार्यवाही करण्यात आली आहे.

(३ ) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## आलमला (ता.औसा.जि.लातूर) येथील जिल्हापरिषद शाळेच्या खुल्या जागेत शहीद सुरेश गोरख चित्ते यांच्या स्मारक बांधकामाच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत

**(५) २८७६ (१८-०४-२०२५). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आलमला (ता.औसा, जि.लातूर) येथील जिल्हापरिषद शाळेच्या खुल्या जागेत शहीद सुरेश गोरख चित्ते यांच्या स्मारक बांधकामासाठीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी (औसा) यांनी मा.ग्रामविकास मंत्री यांना दिनांक २० जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे

खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे (०६-०३-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) आलमला (ता. औसा, जि. लातूर) येथील जिल्हापरिषद शाळेच्या खुल्या जागेत शहीद सुरेश गोरख चित्ते यांच्या स्मारक बांधकामासाठी परवानगी देण्याचा जिल्हा परिषद, लातूर यांचा प्रस्ताव विभागास प्राप्त झाला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने पुतळ्यासाठी जिल्हाधिकारी, लातूर यांची मान्यता व सा.प्र.वि. शासन निर्णय दिनांक ०२/०५/२०१७ मधील तरतुदींची पुर्तता झाली आहे किंवा कसे? तसेच सदर प्रकरणी जिल्हा परिषदेचा ठराव हा माहे जानेवारी, २०२२ मधील असून अलिकडेच जिल्हा परिषद सार्वत्रिक निवडणुकांनुसार जिल्हा परिषदेवर नवीन कार्यकारिणी अस्तित्वात आली असल्यामुळे या प्रकरणी अलिकडे काही कार्यवाही झाली असल्यास तशी अद्ययावत माहिती सादर करावी, असे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना दिनांक ०२/०३/२०२६ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड येथील डॉ. शंकरराव चव्हाण, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे अतिविशेषोपचार (Super Specialty) विभाग सुरु करण्याबाबत**

**(६) ३१७८ (२८-०४-२०२५). ॲड.श्रीजया चव्हाण (भोकर), श्री.राजेश पवार (नायगांव), डॉ.तुषार राठोड (मुखेड), श्री.जितेश अंतापुरकर (देगलूर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड येथील डॉ. शंकरराव चव्हाण, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे उपचारासाठी येणाऱ्या नांदेड जिल्ह्यासह इतर जिल्ह्यातील रुग्णांची संख्या लक्षणीय असल्याने येथे Neurology, Nephrology व Cardiac Care संदर्भात अतिविशेषोपचार (Super Specialty) विभाग सुरु करण्याबाबत सातत्याने मागणी होत आहे, हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, रुग्णांची गरज लक्षात घेता रुग्णांना दिलासा मिळण्याच्या दृष्टीकोनातून अतिविशेषोपचार (Super Specialty) विभाग तात्काळ सुरु करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, डॉ. शंकरराव चव्हाण, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे अतिविशेषोपचार (Super Specialty) विभाग तात्काळ सुरु करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०४-०३-२०२६) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) प्रधानमंत्री स्वास्थ सुरक्षा योजनेंतर्गत डॉ.शं.च.शा.वै.म. नांदेड येथे सुपरस्पेशालिटी हॉस्पीटल ब्लॉक

सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव केंद्र शासनास सादर करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पालघर जिल्ह्यातील अनेक ग्रामपंचायतमधील कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबत

**(७) ३३८९ (२४-०४-२०२५). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.राजेंद्र गावित (पालघर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यातील अनेक ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना मागील पाच महिन्यांपासून वेतन मिळाले नसल्याने या कर्मचाऱ्यांची उपासमार होऊ लागली असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कर्मचाऱ्यांनी जिल्हा परिषद कार्यालयासमोर मोर्चा काढून दिलेल्या निवेदनात थकीत वेतन वेतन देणे, अन्य जिल्ह्याप्रमाणे कोरोना प्रोत्साहन भत्ता देणे, ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना किमान वेतनाचा पगार देणे, सेवानिवृत्ती वेतन देणे, तसेच जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांना ज्या सुविधा मिळतात त्या सुविधा ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना द्याव्यात यावर तसेच इतर मागण्या या निवेदनात केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे (१७-०३-२०२६) :** (१) अशी बाब नाही.

ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना ERP प्रणालीद्वारे ग्रामपंचायतीकडून Pay Pass केल्यानुसार व गट विकास अधिकारी यांनी प्रमाणित केल्यानुसार माहे जून, २०२४ पर्यंतचे वेतन, भविष्य निर्वाह निधी रक्कम अदा करण्यात आले असून, माहे जुलै, २०२४ ते माहे सप्टेंबर, २०२४ चे वेतन थेट ग्रामपंचायत कर्मचारी यांचे खात्यावर वर्ग करण्यात आले आहे. माहे ऑक्टोबर ते माहे डिसेंबर, २०२४ चा निधी गट विकास अधिकारी यांनी ग्रामपंचायत कर्मचारी यांचे खात्यावर वर्ग केला आहे. तसेच माहे जानेवारी ते माहे मे, २०२५ पर्यंतचा निधी देखील ग्रामपंचायत कर्मचारी यांचे खात्यावर अदा करण्यात आलेला आहे. माहे जून व माहे जुलै, २०२५ महिन्याचा निधी जिल्हा परिषदेच्या खात्यावर जमा झालेला असून निधी वितरित करावयाची कार्यवाही सुरु आहे.
(२) व (३) हे खरे नाही.

तथापि, पालघर जिल्हा महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कामगार सेने संघटनेचे दिनांक ३१/१२/२०२४ रोजीचे निवेदन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर यांना प्राप्त आहे. सदर मागण्यांच्या अनुषंगाने ग्रामपंचायतीचे कर्मचारी हे शासनाचे कर्मचारी नसून ग्रामपंचायतीने त्यांच्या कामाच्या सोयीनुसार नेमणूक केलेले कर्मचारी आहे, त्यामुळे सेवानिवृत्ती वेतन व इतर लाभ देणे बाबतचा निर्णय हा ग्रामपंचायतीने स्वतः घेणे क्रमप्राप्त आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औसा (जि.लातूर) विधानसभा मतदारसंघातील प्रत्येक गावात दहन व दफनभूमी उपलब्ध करून देणेबाबत

**(८) ४८०५ (२४-०४-२०२५). श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औसा (जि.लातूर) विधानसभा मतदारसंघातील ज्या गावात स्मशानभूमी नाही त्या गावात अंत्यविधीची गैरसोय होत असल्याने सदरील गावात स्मशानभूमीसाठी दहन व दफन भूमीसाठी जागा उपलब्ध करून देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी लातूर जिल्हा नियोजन समितीच्या आढावा बैठकीत मा.पालकमंत्री, लातूर यांच्याकडे माहे जानेवारी, २०२५ मध्ये मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मतदारसंघात सार्वजनिक स्मशानभूमी नसलेली किती गावे आहेत व किती गावातील स्मशानभूमीसाठी जमीन संपादनाचे प्रस्ताव महसूल प्रशासन व पंचायत समितीकडे प्राप्त झाले आहेत,

(३) असल्यास, सदरील गावातील स्मशानभूमीसाठी जमीन भूसंपादन करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(४) असल्यास, सदरील भूसंपादनासाठी किती निधीची आवश्यकता असून भूसंपादनासाठी निधीची तरतूद करण्याबाबत तसेच ज्या गावात सार्वजनिक स्मशानभूमी नाही अशा प्रत्येक गावात स्मशानभूमीसाठी जमीन संपादन करून स्मशानभूमी उपलब्ध करून देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे (२४-०२-२०२६) :** (१), (२), (३) व (४) हे खरे आहे.

लातूर जिल्हयातील औसा विधानसभा मतदारसंघात औसा तालूक्यातील एकूण ८६ ग्रामपंचायती व ३४ गावे/वाडया/वस्ती/तांडे व निलंगा तालुक्यातील ४८ ग्रामपंचायत व १८ गावे असे एकूण १८६ गावे आहेत.

औसा तालुक्यातील ०४ गावांमध्ये (मासुर्डी, जमालपुर, वाघोली, तुंगी खू.) दहनभूमीसाठी व २ गावांमध्ये (जमालपुर, जयनगर) दफनभुमीसाठी शासकीय जागा नसून सदर ठिकाणी खाजगी भुसंपादन करणे आवश्यक आहे. यापैकी जमालपूर, वाघोली, तुंगी खू. या ३ गावांचे भुसंपादन प्रस्ताव यापूर्वी तहसिल कार्यालयास सादर केले असून प्रस्ताव त्रुटी मुळे २ प्रस्ताव परत करण्यात आले आहे व १ प्रस्ताव महसूलकडे (वाघोली) ७/१२ वर नोंद घेण्यासाठी सादर आहे. तसेच, मासुर्डी, जमालपुर, जयनगर या ठिकाणी खाजगी भुसंपादन करण्यासाठी शेतक-यांना प्रवृत्त करण्यात येत आहे.

निलंगा तालुक्यातील ५ गावांमध्ये दहनभूमीसाठी जागा नाही. या गावांपैकी सिंगनाळ गावातील जागा भूसंपादन करण्याचा प्रस्ताव तहसिलदार, निलंगा यांनी उपविभागीय अधिकारी, निलंगा यांच्याकडे सादर केला असुन पिरुपटेलवाडी येथील जागा भूसंपादन करण्याचा प्रस्ताव तहसिलदार, निलंगा यांच्याकडे सादर करण्यात येत आहे. उर्वरीत ३ गावांमध्ये (माळेगाव जे., वाडी हासोरी, कोराळी वाडी) खाजगी जागा दानपत्राआधारे उपलब्ध करून देण्याबाबत ग्रामपंचायतीमार्फत पाठपुरावा करण्यात येत आहे.

तसेच, निलंगा तालुक्यातील हत्तरगा हा. येथील शासकीय जागा दफन भूमीसाठी साठी

मिळण्याबाबतचा प्रस्ताव तहसील कार्यालय, निलंगा येथे दाखल केला असून लिंगायत समाज दफन भूमीसाठी चिंचोली स. येथील भूसंपादन करण्यासाठीचा प्रस्ताव तहसिलदार, निलंगा यांच्याकडे सादर केला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नांदेड जिल्ह्यातील विविध योजनांचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी कृति आराखडा तयार करण्याबाबत

**(९) ५१७३ (२५-०४-२०२५). श्री.आनंद तिडके (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सर्वांगिण प्रगतीसाठी प्रत्येक विभागाने १०० दिवसांचा कृति आराखडा तयार करुन ठोस कामगिरी करण्याचे निर्देश मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक २६ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास सर्व विभागांना दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निर्देशाप्रमाणे नांदेड जिल्ह्यातील विविध योजनांचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागाने दिनांक ३० जानेवारी, २०२५ रोजी परिपत्रक काढून जिल्ह्यातील सर्व गट विकास अधिकाऱ्यांना शनिवार व रविवार या सुट्टीच्या दिवशी कार्यालय चालू ठेवण्याच्या सूचना दिल्या होत्या, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बिलोली पंचायत समितीने जिल्हा परिषदेच्या आदेशाचे पालन न करता कार्यालय बंद ठेवले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करून दोषी असलेल्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे (०२-०३-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(२) व (३) खरे नाही. बिलोली पंचायत मधील कर्मचारी यांनी दिनांक ०१/०२/२०२५ व दिनांक ०२.०२.२०२५ या सुट्टीच्या दिवशी उपस्थित राहून केंद्र पुरस्कृत योजना घरकुलचे काम व इतर योजनेचे उद्दीष्ट पुर्ण करण्याचे काम केले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## विल्होळी (जि.नाशिक) ग्रामपंचायत हद्दीतील नागरिकांना मुलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत

**(१०) ५२७३ (२७-०४-२०२५). श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विल्होळी (जि.नाशिक) ग्रामपंचायत हद्दीत असलेल्या वस्तीतल्या नागरिकांना पाणी व विजेपासून वंचित रहावे लागत असल्याचे नुकतेच माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या आदिवासी वस्तीवरील महिलांना हंडाभर पाण्याकरिता नाशिक–मुंबई महामार्गावर जीव

धोक्यात घालून रस्ता ओलांडावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन वस्तीतल्या महिलांना मुलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे (१७-०३-२०२६) :** (१) अशी बाब नाही.

विल्होळी हद्दीत कुसुमाग्रजनगर, संघर्षनगर व बजरंगवाडी वस्ती असून वस्तीमधील नागरिकांना पिण्याचे पाणी नळ जोडणीद्वारे पाणी पुरवठा होतो, तसेच तसेच विजेची सुविधा देण्यात येत आहे.
(२) अशी बाब आढळून आली नाही.

सर्व वस्तीमध्ये नळ जोडणीद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बीड जिल्ह्यात कोरोना काळात जिल्हा नियोजन समिती व शासनाच्या निधीमधून केलेल्या खरेदीत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(११) ५५०५ (०५-०५-२०२५). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड जिल्हयातील जिल्हा रुग्णालयासह उपजिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये, वृद्धत्व व मानसिक आजार व स्त्री रुग्णालय, लोखंडीसावरगाव (ता. अंबाजोगाई) व स्वामी रामानंद तीर्थ शासकीय ग्रामीण रुग्णालय, अंबाजोगाई येथे कोरोना काळात जिल्हा नियोजन समिती (DPC) व शासनाच्या निधी मधून मोठ्याप्रमाणात औषधी खरेदी, मास्क, पी. पी किट्स, पलंग व इतर खरेदी खरेदीप्रक्रियेत अनियमितता व गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करून संबंधीतावर कारवाई करणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. आरोग्य मंत्री यांच्याकडे दिनांक १२ फेंब्रुवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करून संबधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर (२५-०२-२०२६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे आहे.
(३) दिनांक १०/०५/२०२२ ते १३/०५/२०२२ या कालावधीत विशेष लेखा परीक्षण करण्यात आले. तसेच याप्रकरणी केलेल्या प्राथमिक चौकशीमध्ये खरेदीप्रक्रियेत अनियमितता झाल्याचे अनियमितता आढळून आल्याने डॉ. अशोक थोरात, तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सक इतर यांचेसह इतर जबाबदार अधिकारी/ कर्मचारी यांच्याविरूद्ध दिनांक १२/०५/२०२३ रोजीच्या ज्ञापनान्वये विभागीय चौकशी सुरू करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जिल्हा परिषद बीड मधील लेखाशिर्ष २५१५-१२३८ या योजने अंतर्गत निधी मागणीमध्ये अननियमितता व दुबार निधी मागणी होत असल्याबाबत

**(१२) ५९२७ (२४-०४-२०२५). श्री.संदिप क्षीरसागर (बीड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभाग क्र. १ व २ च्या वतीने आपल्या विभागाकडे सातत्याने वरील लेखाशिर्षासाठी निधीची मागणी होत असून निधीची मागणी होत असतांना सदरील कामे कोणत्या वर्षात मंजूर झालेली आहे अथवा सलग सहा ते सात वर्षे सदरील कंत्राटदाराने अथवा विभागाने कामे पुर्ण कोणत्या नियमावलीनुसार केलेली नाहीत अथवा आपल्या विभागाने देखिल सदरील कामांची निधी मागणी शासनाच्या कोणत्या परिपत्रकाद्वारे केलेली नाही याची खातरजमा करणे गरजेचे आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील संचिका जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या वतीने शासनाकडे वर्ग होत असतांना सर्व नियमांचे उल्लंघन करण्यात येत असून अशा व इतर बाबीच्या बाबतीत अनेक तक्रारी स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्याकडे प्राप्त झाल्या असून सर्व संचिकेची स्तरनिहाय, संचिकानिहाय चौकशीची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी पत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विभागाचे शासन परिपत्रकाचे अवलोकन होत असतांना विकास कामांची व निधीची खातरजमा होणे गरजेचे असतांना अशा बाबी निदर्शनास आलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सन २०२० ते माहे जानेवारी २०२५ दरम्यान ज्या निधी मागणीच्या संचिका शासनाकडे गेलेल्या आहेत व त्याद्वारे निधी प्राप्त झालेला आहे अशा सर्व संचिकेची नियमोचीत चौकशीची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे (२४-०२-२०२६) :** (१), (२), (३), (४) व (५) यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हा परिषद, बीड यांना पत्र दिले होते.

२५१५-१२३८ या लेखाशिर्षांतर्गत मंजूर केलेली कामे पूर्ण झाल्यानंतर, त्या कामाची देयके अदा करण्यासाठी सन २०२० नंतर शासनाने तयार केलेल्या LPRS प्रणालीवर ऑनलाईन नोंदविली जाते. बीड जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभाग क्र.१ व क्र.२ अंतर्गत लेखाशिर्ष २५१५-१२३८ या योजनेंतर्गत पूर्ण झालेल्या कामांची देयके LPRS प्रणालीवर ऑनलाईनव्दारे प्राप्त झाली होती.

या मागणीनूसार दिनांक ०९/०७/२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये, सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी बीड जिल्ह्यासाठी रु.२,५६,८३,९६६/- इतका निधी उपलब्ध करुन दिला होता. यामध्ये ९ कामांना जिल्हा परिषद, बीड यांच्या मागणीमुळे दुबार निधी वितरीत झाला आहे. सदरील प्राप्त दुबार निधी एकूण रु.२६,५६,६९१/- जिल्हा परिषदेने शासन खाती जमा केला आहे. तसेच दुबार निधीची मागणी करणाऱ्या जबाबदार तत्कालिन कर्मचारी यांना दिनांक २६/९/२०२५ रोजीच्या पत्रान्वये कारणे दाखवा नोटीस देऊन त्यांचा खुलासा मागविण्यात आलेला आहे.

---

## चंद्रपूर जिल्हा सुरक्षा मंडळातील सुरक्षा रक्षकांच्या मागण्यांची पूर्तता करण्याबाबत

**(१३) ६०४२ (२४-०४-२०२५). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हा सुरक्षा मंडळातील थांबलेली भरती प्रक्रिया त्वरीत सुरू करण्याबाबतच्या प्रमुख मागणीसह नोंदणी केलेल्या व आस्थापनाने शिफारस केलेल्या शासकीय तंत्रनिकेतन, गडचिरोली येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, चंद्रपूर येथील परिणामित सुरक्षा रक्षकांना मंडळात नोकरी उपलब्ध करून देणेबाबत व चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्रातील परिणामित नोंदणीकृत सुरक्षा रक्षकांना प्रतिक्षा यादीवर घेवून आवश्यक ठिकाणी नोकरी उपलब्ध करुन देण्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी मा. कामगार मंत्री यांना दिनांक १४ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवदेनाच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्याअनुषंगाने सदर मागण्यांची पूर्तता करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर (०४-०३-२०२६) :** (१) चंद्रपूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळातील भरती प्रक्रीया राबविण्याच्या अनुषंगाने मा.लोकप्रतिनिधींची वेळोवेळी पत्र/ निवेदने प्राप्त झालेली आहेत.

(२) आणि (३) सदरहू भरती प्रक्रीया राबविण्यासाठी मान्यता देण्याच्या अनुषंगाने योग्य ती कार्यवाही सुरु आहे.

---

## मुंबईतील सर जे.जे. रुग्णालयातील डॉक्टर व कर्मचारी यांनी बेकायदा बँकेत खाते उघडून आर्थिक अपहार केल्याबाबत

**(१४) ६०६४ (२८-०४-२०२५). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील सर जे.जे. रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालयातील सर्जिकल, एनाटॉमीसह ११ विभागांच्या प्रमुखांनी शासन परवानगी न घेता बँकामध्ये स्वतंत्र खाते उघडून त्यामधील जमा रु. ६ कोटी इतक्या निधीतून डॉक्टरांनी परदेशवारी, हॉटेलची बिले आणि वैद्यकीय उपकरणे खरेदी केल्याचे निदर्शनास आले असतानाही सदरहू प्रकरणी अद्यापही संबंधित दोषी डॉक्टरांविरुद्ध कठोर कारवाई न करता समिती स्थापन करण्याचे आदेश दिनांक १७ मार्च, २०२३ रोजी देऊनही अद्याप याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अकरा विभागातील प्रमुखांनी खाजगी बँकेत खाते उघडून त्याचा गैरवापर करणाऱ्या डॉक्टरांची नावे काय आहेत, तसेच सदरहू दोषी डॉक्टरांविरुद्ध कारवाई न करता त्यांना रु. ६ कोटी इतका उर्वरित निधी शासकीय कोषागारात जमा करण्याचे आदेश देण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, या प्रकरणाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबधित दोषी डॉक्टरांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (१७-०३-२०२६) :** (१), (२) व (३) मुंबई येथील सर जे.जे. रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालयातील ११ विभागाच्या प्रमुखांनी शासन परवानगी न घेता बँकेत खाते उघडले आहे, हे खरे आहे. वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या दिनांक २५/०८/२०२१ रोजीच्या पत्रान्वये शासनाच्या परवानगीशिवाय उघडलेली बँक खाती बंद करण्याचे व सदर बँक खात्यांमधील रक्कम आहरण व वितरण अधिकारी यांच्या खात्यात जमा करून चलनाने कोषागारात भरण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. सदर प्रकरणी वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाने गठीत केलेल्या समितीच्या अहवालास अनुसरून त्यासाठी जबाबदार अधिकारी यांच्याकडून खुलासे मागविण्यात आले आहेत.

वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाने खालील अधिका-यांची नावे कळविली आहेत:-

विकृतीशास्त्र- डॉ. ग्रेस डिकोस्टा, प्राध्यापक
डॉ. डी.एन. लांजेवार, प्राध्यापक
डॉ. ए.जी. वालंद, प्राध्यापक
डॉ. एस. रघुवंशी, सहयोगी प्राध्यापक
शरिररचनाशास्त्र - डॉ. दिपक जोशी, प्राध्यापक
डॉ. शबाना बोराटे, सह प्राध्यापक
डॉ. वैशाली बोंडगे, सह प्राध्यापक
अस्थिव्यंगोपचार- डॉ. नादीर शाह व डॉ. संदिप गव्हाळे
शल्यचिकित्सा- डॉ. अजय भांडारवार, प्राध्यापक
डॉ. गिरीश बक्षी, प्राध्यापक
डॉ. अमोल वाघ, सहायक प्राध्यापक
जीवरसायनशास्त्र- डॉ. व्ही ड्ब्ल्यू पाटील

तसेच, याप्रकरणी करावयाच्या कार्यवाहीच्या अनुषंगाने आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांच्या कार्यालयाकडून काही मुद्यांबाबत अधिक माहिती मागविली आहे. त्यांचेकडून प्राप्त होणारी माहिती विचारात घेऊन नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## हिंगोली जिल्ह्यातील औंढा नागनाथ पंचायत समितीच्या अभिलेखे विभागात लागलेल्या आगीत महत्त्वाची कागदपत्रे जळून खाक झाली असल्याबाबत

**(१५) ६१२४ (२४-०४-२०२५). श्री.तानाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यातील औंढा नागनाथ पंचायत समितीच्या अभिलेखे विभागात लागलेल्या आगीत महत्त्वाची कागदपत्रे जळून खाक झाल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पंचायत समितीच्या अभिलेखे विभागात सन २०१९-२० पासून पुढील तीन वर्षांची कॅशबुक व इतर महत्त्वाची कागदपत्रे होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पंचायत समिती लेखा विभागाच्या सन २०१७-१८ व २०१८-१९ या वर्षातील कामाची चौकशी करण्याची स्थानिक नागरिकांकडून व लोकप्रतिनिधींकडून मागणी होत आहे, हे ही खरे

आहे काय,
(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने चौकशी केली आली आहे काय, त्याअनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे (०२-०३-२०२६) :** (१), (२), (३) व (४) हिंगोली जिल्हयातील पंचायत समिती औंढा नागनाथ येथील लेखा विभागामध्ये रविवार दिनांक १/१२/२०२४ रोजी आग लागून सन २०१८-१९ ते २०२२-२३ या कालावधीतील रोखवहया, जिल्हा निधी, अभिकरण योजना, जिल्हा परिषद उपकर इत्यादी रोखवहया जळाले असल्याचे निदर्शनास आले आहे.

उप आयुक्त (विकास), छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्त कार्यालय यांनी चौकशी करण्याचे निर्देश दिले.

उप आयुक्त (विकास), छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्त कार्यालय यांचे निर्देशानुसार लेखाधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांचे पथकामार्फत चौकशी करण्यात आली.

त्यानुसार संबधितांना कारणे दाखवा नोटिस बजावण्यात आली आहे. आगीच्या घटनेसंदर्भात प्रथम खबर अहवाल दाखल करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मौजे ऐतवडे बुद्रुक (ता.वाळवा, जि.सांगली) येथे शिक्षण महर्षी कर्मवारी भाऊराव पाटील यांचे भव्य स्मारक उभारणेबाबत

**(१६) ६२९५ (२४-०४-२०२५). श्री.सत्यजित देशमुख (शिराळा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिक्षण महर्षी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या मौजे ऐतवडे बुद्रुक (ता.वाळवा, जि.सांगली) या मुळ गावी भव्य दिव्य स्मारक उभारण्याची स्थानिक तसेच पंचक्रोशीतील कर्मवीर प्रेमी नागरिकांकडू व लोकप्रतिनिधींच्याही तीव्र भावना असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात अनेक ठिकाणी शिक्षण महर्षी यांनी रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून शिक्षणाची गंगा तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी अविरतपणे कार्य केल्याने उक्त जिल्हा परिषद मराठी मुलींच्या बंद असलेल्या शाळेची जागा स्मारकासाठी देण्यात यावी असा निर्णय जिल्हा परिषद सांगलीतील जनरल मिटींगमध्ये घेण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त ठिकाणी शिक्षण महर्षी कर्मवीर भाऊराव पाटील यांचे भव्य दिव्य स्मारक उभारण्याबाबत स्थानिक नागरिक, ग्रामपंचायत ऐतवडे बुद्रुक, पंचक्रोशीतील कर्मवीर प्रेमी नागरिकांनी मा.मुख्यमंत्री, स्थानिक लोकप्रतिनिधीकडे वारंवार मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्याअनुषंगाने उपरोक्त ठिकाणी भव्य दिव्य स्मारक उभारण्यासह इतर अनेक सोयी-सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे (२७-०२-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) होय, हे खरे आहे.

(४) मौजे ऐतवडे बुद्रुक (ता.वाळवा, जि.सांगली) येथे कर्मवीर भाऊराव पाटील यांचे स्मारक उभारण्याकरिता ग्रामपंचायत क्षेत्रात जागा उपलब्धतेबाबत स्थळपाहणी करून अशासकीय सदस्यांच्या नावासहीत समिती गठणाबाबतचा प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी, सांगली यांना विभागाच्या दिनांक २२/०९/२०२५ च्या पत्राद्वारे देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील ग्रामपंचायतीमध्ये विविध पदांवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी लागू करणेबाबत

**(१७) ६५३३ (०५-०५-२०२५). श्री.संजय पुराम (आमगाव), श्री.बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील २७,९२० ग्रामपंचायतीमध्ये सफाई कामगार, पाणीपुरवठा कामगार, विद्युत पुरवठा कामगार, कर वसुली कर्मचारी आणि लिपिक इत्यादी पदांवर सुमारे ६० हजारपेक्षा अधिक वर्ग-४ दर्जाचे कर्मचारी अत्यल्प वेतनात काम करीत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ च्या दुसऱ्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कर्मचाऱ्यांनी फार अत्यल्प वेतनात काम करावे लागत असल्यामुळे या कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी लागू करण्यासाठी शासनस्तरावरुन विविध समित्या स्थापन करण्यात आल्या, परंतु अद्याप त्यांना वेतनश्रेणी लागू करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रामविकास विभागाचे दिनांक २२/०६/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये ग्रामपंचायतीचे उत्पन्न, लोकसंख्या व वसुलीच्या टक्केवारीनुसार ५० टक्के, ७५ टक्के व १०० टक्के अनुदान ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या खात्यावर जमा होत असते, या अनुदानाव्यतीरिक्त ग्रामपंचायतीच्या हिस्स्याची वेतनापोटी देय असलेली २५ टक्के आणि ५० टक्के रक्कम बऱ्याच ग्रामपंचायती देण्यास टाळाटाळ करीत असल्यामुळे कर्मचाऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असल्याचे संघटनेने दिलेल्या निवेदनावरुन निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कर्मचारी युनियनने राज्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना वेतन अनुदानासाठी लावलेली उत्पन्न व वसुलीची अट रद्द करुन किमान वेतनासाठी १०० टक्के अनुदान व वेतणश्रेणी लागू करण्याची मागणी कर्मचाऱ्यांनी आंदोलने, मोर्चे काढून तसेच शासनाकडे निवेदने सादर केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त निवेदनातील मागणीच्या अनुषंगाने शासनाने स्थापित केलेल्या एकूण ५ समित्यांच्या सकारात्मक अहवालानुसार राज्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना वेतन अनुदानासाठी लावलेली उत्पन्न व वसुलीची अट रद्द करुन वेतणश्रेणी लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, कार्यवाहीच्या सद्य:स्थितीचा तपशिल काय आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे (१७-०३-२०२६) :** (१) हे खरे नाही.

ERP प्रणालीनुसार सद्यस्थितीत खालीलप्रमाणे विविध पदावर नोंदणीकृत ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांची संख्या आहे.

| | |
|---|---|
| कुशल | ४६६४/- |
| अर्धकुशल | १८९८०/- |
| अकुशल | २४८८५/- |
| एकूण | ४८५२९/- |

शासन निर्णय दिनांक २२/०६/२०२२ अन्वये ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना सुधारित किमान वेतन लागू केले आहे. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम ६१ प्रमाणे ग्रामपंचायतीला त्यांच्या आवश्यकते प्रमाणे कर्मचारी नेमण्याचे व त्यांचे वेतन ठरविण्याचे अधिकार आहेत.

(२) हे अंशतः खरे आहे.

ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या वेतन व आकृतिबंधाबाबत समितीचा अहवाल शासन स्तरावर विचाराधीन आहे.

(३) अशी कोणतीही बाब निदर्शनास आलेली नाही.

(४) ग्रामपंचायत कर्मचारी यांनी त्यांच्या विविध मागण्यां संदर्भात शासनास निवेदन सादर केलेली असून शासन निर्णय दिनांक ०४ नोव्हेंबर, २०२५ अन्वये ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना कर वसुलीची अट रद्द करण्यात आली आहे.

(५) ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना वेतन अनुदानासाठी लावलेली वसुलीची अट शासन निर्णय दिनांक ०४ नोव्हेंबर, २०२५ अन्वये रद्द करण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कन्नड (जि. छत्रपती संभाजीनगर) तालुक्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ करण्याबाबत

**(१८) ६६३२ (०५-०५-२०२५). श्रीमती रंजनाताई (संजना) जाधव (कन्नड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कन्नड (जि.छत्रपती संभाजीनगर) तालुक्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनी शासनाने किमान सुधारित वेतन लागू करावे तसेच वसूलीची अट त्वरित रद्द करुन १०० टक्के किमान वेतन राहणीमान भत्यासह द्यावे, दर महिन्याच्या सात तारखेपर्यंत वेतन अदा करावे अशा विविध मागण्यांचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींकडे सादर केले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी मागील ३० वर्षांपासून शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने सन २०१७ मध्ये अभय यावलकर समिती नियुक्त केली होती या समितीने राज्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना नगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतनश्रेणी लागू करावी अशी शिफारस केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीअंती काय

आढळून आले त्याअनुषंगाने सदर ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे (१७-०३-२०२६) :** (१) अशी कोणतीही बाब शासनास निदर्शनास आलेली नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) हे खरे नाही.

यावलकर समितीने ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना नगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतनश्रेणी लागू करावी अशी शिफारस केली नाही.
(४) शासन निर्णय दिनांक २२ जून, २०२२ अन्वये ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना सुधारित किमान वेतन लागू केले आहे. तसेच शासन निर्णय दिनांक ०४ नोव्हेंबर, २०२५ अन्वये ग्रामपंचायत कर्मचारी यांच्या वेतनासाठीची कर वसुलीची अट रद्द करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महिला बचत गटांकडून बनविण्यात येणाऱ्या वस्तूच्या विक्रीकरिता मॉल मध्ये सवलतीच्या दरात जागा राखीव ठेवण्याबाबत**

**(१९) ६६५३ (२४-०४-२०२५). श्री.अभिजीत पाटील (माढा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील महिला बचत गटांकडून बनविण्यात येणाऱ्या मालाला/वस्तूंना बाजारपेठ मिळावी यादृष्टीने शासन स्तरावर काही योजना आखण्यात आली आहे काय,
(२) असल्यास, महिला बचत गटांच्या विक्रीकरिता मॉल मध्ये जागा राखीव ठेवून त्यांना सवलती दरात जागा देण्याबाबत शासन विचाराधीन आहे काय,
(३) असल्यास, अर्बन शहरात शासकीय जागेत बचत गट मॉल उभारण्यबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे काय व त्याचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,
(४) असल्यास, यासंदर्भात कधीपर्यत निर्णय घेण्यात येणार आहे वा आला आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे (२५-०२-२०२६) :** (१) होय,
(२) राजमाता जिजाऊ महिला सक्षमीकरण योजनेअंतर्गत सणासुदीच्या काळामध्ये महिला स्वयंसहाय्यता बचतगटांना जिल्ह्याच्या ठिकाणी उत्पादित वस्तु विक्रीकरिता जागा उपलब्ध करुन देण्याबाबत नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. मसयो-२०२४/प्र.क्र.३७८/नवि-२०, दिनांक १५/१०/२०२४ निर्गमित केला आहे.
(३) व (४) शासन निर्णय, ग्राम विकास विभाग, दिनांक ११/०८/२०२५ व शासन शुद्धिपत्रक, दिनांक ०१/०१/२०२६ अन्वये पहिल्या टप्प्यात १३ जिल्ह्यांमध्ये “उमेद मॉल (जिल्हा विक्री केंद्र)” उभारणी करणेबाबत निर्णय घेण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील पाणीटंचाई दूर करण्यासाठी करावयाच्या उपाययोजना

**(२०) ७०९९ (१९-०९-२०२५). श्री.अमोल खताळ (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.सचिन पाटील (फलटण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.निलेश राणे (कुडाळ), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालीक (मालेगांव मध्य), श्री.विठ्ठल लंघे (नेवासा), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात माहे एप्रिल-मे, २०२५ मध्ये ३६ पैकी १७ जिल्हयात पाणी टंचाई निर्माण झाल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आली असून गेल्या काही दिवसांपासून तापमानात झालेल्या वाढीमुळे ग्रामीण भागात पाणीटंचाई निर्माण झाल्यामुळे माहे मार्च-एप्रिल, २०२५ मध्ये पाणी टँकरची मागणी वाढलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास राज्यातील किती जिल्हयातील किती गावांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याची मागणी करण्यात येत आहे त्याप्रमाणे किती जिल्हयात किती गावात पाणी टँकर पुरवठा करण्यात येत आहे,

(३) तसेच, संगमनेर (जि.अहिल्यानगर) तालुक्यात उन्हाळयात पाणीपुरवठा करण्याची मागणी स्थानिक नागरीकांनी तसेच लोकप्रतिनिधीनी लेखी निवेदनाद्वारे केली असतानाही शासनाच्या जटिल अटींमुळे टँकरद्वारे पाणीपुरवठा मंजुरी प्रक्रियेत विलंब होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, लातूर जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये उन्हाळयात जलस्रोत आटल्याने भीषण पाणीटंचाई निर्माण झाली असून अशा जलस्त्रोतावर अवलंबून असणाऱ्या जिल्ह्यातील ६७ गावांना याचा मोठा फटका बसल्याने नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय

(५) तसेच, हरोसाळे (ता.वाडा, जि.पालघर) ग्रामपंचायतीच्या हद्दीतील गावठाण पाडा आणि उंबरोठे भागातील नदी पाडा येथील विहिरींमध्ये पाण्याची पातळी घटल्याचे निदर्शनास आले असून गावठाण पाडा आणि उंबरोठे भागातील स्थानिक महिलांना पाण्यासाठी पायपीट करावी लागत असून विक्रमगड तालुक्यात जलजीवन मिशन योजनेची कामे अपूर्ण स्थितीत असल्याने गावपाड्यात पाणी टंचाईचा समस्या जाणवत हे, हे ही खरे आहे काय आहे ,

(६) असल्यास, सिंधुदुर्ग जिल्हात व मालेगाव (जि. नाशिक) तालुक्यातहि भीषण पाणी टंचाईची समस्या जाणवत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, राज्यातील पाणीटंचाई दूर करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे. नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२५-०२-२०२६) :** (१) हे खरे आहे.

(२) दिनांक २३ मे २०२५ रोजी राज्यातील सर्वाधिक २२ जिल्ह्यामध्ये शेवटचा पर्याय म्हणून १३३५ गावे व ३८१४ वाड्यांमध्ये एकूण १५६६ टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात आला आहे.

(३) हे खरे नाही,

जिल्हा परिषद, अहिल्यानगर यांच्याकडून प्राप्त अहवालानूसार माहे मार्च-एप्रिल २०२५ या कालावधीत संगमनेर तालुक्यात उन्हाळयात पाणी पुरवठा करण्यासाठी ग्रामपंचायत पातळीवरुन एकुण १९ महसुली गावांचे प्रस्ताव प्राप्त झाले. प्रस्तावासोबत ग्रामस्थांचे अर्ज ग्रामपंचायतीने सादर केले होते. प्राप्त प्रस्तावांची छाननी करुन नियमानुसार प्रस्ताव प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून तीन दिवसात उपविभागीय कार्यालयास सादर करुन त्याच दिवशी किंवा दुसऱ्या दिवशी मंजुरी मिळालेली असून शक्यतो त्याच दिवशी अथवा ४८ तासात टँकर विनाविलंब सुरु करण्यांत आले आहेत.सदर कालावधीमध्ये एकुण १९ महसूली गावांना टंचाई परिस्थीती निर्माण झाली होती. एकुण १६ गावठाण व ४४ वाडयांना १९ टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात आला.

(४) जिल्हा परिषद, लातूर यांच्याकडून लातूर जिल्ह्यात ज्या गावामध्ये पाणी टंचाई निर्माण झाली होती अशा गावामध्ये तात्काळ विहिर अधिग्रहण करण्यात यावे अश्या सूचना तालुकास्तरावर देण्यात आल्या होत्या. ७८ गावे व वाड्याकरीता ९० विहिरी अधिग्रहण करून पाणीपुरवठा सुरू होता. माहे मे, २०२५ अखेर सर्व (०३) टँकरद्वारे होत असलेला पाणी पुरवठा मुबलक पाऊस झाल्यामूळे बंद करण्यात आला होता.

(५) हे खरे नाही.

वाडा तालुक्यातील मौजे हरोसाळे ग्रामपंचायत हद्दीतील गावठाणपाडा येथील अस्तित्वातील लघुनळ पाणी पुरवठा योजनेची मोटार केबल व पाईपलाईन लागलेल्या वणव्याच्या आगीमुळे जळाले असल्यामुळे टंचाई निर्माण झाली होती. संबंधित ग्रामसेवक यांनी तातडीने केबल व पाईप दुरुस्त करुन सदर ठिकाणी पाणी पुरवठा सुरू केला आहे.

मौजे उंबरोठे अंतर्गत नदीचापाडा येथे प्राप्त प्रस्तावानूसार दिनांक १७/०४/२०२५ रोजी टँकरने पाणी पुरवठा सुरु करण्यात आला. दिनांक १९/०६/२०२५ पासून पुरेसे पर्जन्यमानामुळे जिल्ह्यातील टंचाईग्रस्त तालुक्यातील टँकर बंद करण्यात आले.

जिल्हा परिषद, पालघर यांच्या अहवालानूसार विक्रमगड तालुक्यात जलजीवन मिशन योजनेअंतर्गत एकूण ७९ योजना घेण्यात आल्या आहेत. त्यापैकी २४ योजना भौतिकदृष्ट्या पुर्ण झाल्या असून उर्वरित ५५ योजनांची कामे वेगवेगळया टप्प्यांवर प्रगतीपथावर आहेत.

(६) अंशत: खरे आहे.

सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये पाणी टंचाईची समस्या जाणवत असल्याची बाब नाही.

तथापि, नाशिक जिल्ह्यामध्ये ता. मालेगाव येथे सन २०२४-२५ मध्ये मागणीनुसार १५ गावे व ३९ वाड्यांना एकूण १५ टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात आला आहे.

(७) ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याची समस्या कायमस्वरूपी दूर करण्यासाठी राज्यात केंद्रपुरस्कृत जल जीवन मिशन कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

अस्तित्वातील पाण्याच्या स्त्रोतांमधून पाणी पुरवठा सूरू असून, ज्या ठिकाणी उपलब्ध स्त्रोताद्वारे पाणी पुरवठा नियमित होत नाही; त्या ठिकाणी टंचाई कालावधीत टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येतो.

---

## पालघर जिल्ह्यातील ग्रामपंचायतींना डम्पिंग ग्राउंड उपलब्ध करून देण्याबाबत

**(२१) ७२७७ (१९-०९-२०२५). श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यात विविध ग्रामपंचायती मार्फत घराघरातून घनकचरा संकलन केला जातो तसेच सार्वजनिक ठिकाणी दररोज साफसफाई होऊनही मोठ्या प्रमाणात कचरा जमा होतो मात्र ग्रामपंचायतीच्या मालकीचे डम्पिंग ग्राउंड व या कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची कोणतीही उपायोजना उपलब्ध नसल्यामुळे मोठ्या प्रमाणावर दुर्गंधी पसरत असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने ओला व सुका अशा कचरा प्रक्रियेस डम्पिंग ग्राउंड उपलब्ध करून देणेसाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२७-०२-२०२६) :** (१) पालघर जिल्हयातील वाडा, मोखाडा, विक्रमगड, तलासरी या तालुक्यातील ग्रामपंचायतीमध्ये घनकचरा व्यवस्थापनाकरीता नाडेपचे बांधकाम सुरु आहे. घराघरातुन निघणारा ओला व सुका कचरा नाडेप मध्ये टाकण्यात येत असुन त्याचे रुपांतर खतामध्ये करण्याची प्रक्रिया ग्रामपंचायत पातळीवर करण्यात आली आहे. वसई तालुक्यातील शहरी भागातील महानगरपालिका नजीकच्या ग्रामपंचायतीमधुन दररोज घराघरातून निघणारा एकत्रीत कचरा महानगरपालिकेमार्फत संकलीत करण्यात येतो. तसेच ग्रामीण भागातील ग्रामस्थ त्यांच्या कचऱ्याचे नियोजन वैयक्तिक स्तरावर, सार्वजनिक नाडेप किंवा त्यांचे शेतामध्ये करतात.

जव्हार तालुक्यामध्ये ग्रामपंचायत स्तरावर घराघरातुन निघणारा कचरा ग्रामपंचायती मार्फत संकलन केला जातो. तसेच सार्वजनिक ठिकाणी रोज साफसफाई करुन त्यामध्ये अल्प प्रमाणात जमा होत असल्याने सदरचा कचरा ग्रामपंचायतीने तयार केलेल्या नाडेप मध्ये जमा करुन खत तयार करण्याची प्रक्रिया सुरु आहे. पालघर तालुक्यातील बोईसर MIDC लगतच्या बोईसर, सालवड, खैरापाडा, पास्थळ, तारापूर, कोळगांव, कुंभवली, टेंभी, बेटेगाव, कोलवडे, पाम, सरावली, कुरगांव व मान या ठिकाणी ग्रामपंचायत मार्फत घंटागाडी, ट्रॅक्टर, ट्रायसायकल बॅटरी ऑपरेटेड सायकल मार्फत कचरा संकलन करण्यात येतो. तसेच सार्वजनिक ठिकाणी दररोज जमा होणार कचरा सद्य:स्थितीत सरावली ग्रामपंचायत हद्दीतील खाजगी जागेत टाकला जातो. त्यामुळे दुर्गंधी पसरत नाही. तथापि, डहाणू तालुक्यातील ग्रामपंचायत चिंचणी येथे कचरा संकलन व विल्हेवाट लावण्यासाठी डम्पिंग ग्राऊंड नसल्याने दुर्गंधी पसरत असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) पालघर तालुक्यातील बोईसर MIDC लगतच्या बोईसर, सालवड, खैरापाडा, पास्थळ, तारापूर, कोळगांव, कुंभवली, टेंभी, बेटेगाव, कोलवडे, पाम, सरावली, कुरगांव व मान ग्रामपंचायतींना डम्पिंग ग्राऊंडच्या जागेसाठी जि.प. पालघर यांचेकडील पत्रान्वये मा. जिल्हाधिकारी, पालघर यांचे कडे जागेची मागणी करण्यात आली आहे.

तसेच, डहाणू तालुक्यातील ग्रा.पं. चिंचणी यांचेकडे स्वतःची जागा उपलव्ध नसल्याने वन विभागाच्या जागेचा प्रस्ताव वनक्षेत्र अधिकारी बोईसर यांच्याकडे सादर करण्यात आला होता. परंतु वन

विभागाची जागा कांदळवनात येत असल्याने वनेत्तर कामे करण्याकरिता उच्च न्यायालयाची परवानगी असणे आवश्यक असल्याचे वनक्षेत्र अधिकारी बोईसर यांनी पत्राद्वारे कळविले.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नागपूर येथील कामगार रुग्णालयात पायाभूत व रुग्णसुविधा उपलब्ध करुन देणेबाबत.**

**(२२) ७३८० (२३-०९-२०२५). डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथे दिनांक ७ एप्रिल, २०२५ या जागतिक आरोग्य दिनाच्या निमित्ताने राज्य कामगार विमा सोसायटी रुग्णालयामध्ये विमाधारक कामगारांव्यतिरिक्त इतर सर्वसामान्य जनतेला उपचार खुले करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अद्याप येथे महात्मा फुले जनआरोग्य विमा योजना, आयुष्यमान योजनेंतर्गत एकाही सर्वसामान्य रुग्णांवर उपचार होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याशिवाय येथे डॉक्टर परिचारिका, चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांची ५० टक्के पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेऊन सदर रुग्णालयात पायाभूत व रुग्णसुविधा उपलब्ध करुन देणेबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर (२५-०२-२०२६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

आरोग्य दिनाच्या निमित्ताने दिनांक ०७/०४/२०२५ पासून राकावियो रूग्णालय, नागपूर सह राज्यातील सर्व राकावियो रुग्णालयांमध्ये विमारूग्णांव्यतिरिक्त सर्व सामान्य जनतेला महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजना अंतर्गत उपचार पुरविण्यात येत आहेत.
(२) हे खरे नाही.

राकावियो रूग्णालय, नागपूर येथे महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजना अंतर्गत दिनांक ०७/०४/२०२५ पासून दिनांक ३०/०६/२०२५ अखेर एकूण ६६ रूग्णांना बाह्यरूग्ण उपचार पुरविण्यात आले आहेत.
(३) हे अंशत: खरे आहे.

सदर रूग्णालयातील डॉक्टर, परिचारिका व चतुर्थ श्रेणी कर्मचारी यांच्या एकूण २३३ मंजूर पदांपैकी नियमित स्वरुपात ८५ पदे व कंत्राटी स्वरुपात ११२ पदे भरलेली असुन, ३६ पदे रिक्त आहेत.
(४) सदर रुग्णालयातील नियमित व कंत्राटी स्वरुपात मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्यात आले आहे. तसेच सदर रुग्णालयाकरीता आवश्यक वैद्यकीय उपकरणे उपलब्ध करुन देण्यात आली असुन, मागणीनुसार इतर वैद्यकीय उपकरणे उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु आहे. याव्यतिरिक्त सदर रुग्णालयामध्ये ICU स्थापित झाले असून, त्याकरीता आवश्यक साधनसामुग्री उपलब्ध करून देण्याची कार्यवाही सुरू आहे.
(५) विलंबाचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बांधकाम कामगारांप्रमाणे माथाडी कामगार व इतर कष्टकरी वर्गाला निवृत्ती वेतन मिळण्याबाबत

**(२३) ७६७६ (१९-०९-२०२५). श्री.करण देवतळे (वरोरा), श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्री.सत्यजित देशमुख (शिराळा), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.राजन नाईक (नालासोपारा), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बांधकाम कामगारांना दरवर्षी रुपये १२ हजार इतके निवृत्ती वेतन म्हणून देण्याची घोषणा शासनाने अर्थसंकल्पीय अधिवेशन, २०२५ मध्ये केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बांधकाम कामगारांप्रमाणे माथाडी कामगार व इतर कष्टकरी वर्गालाही निवृत्ती वेतन मिळण्याची मागणी अखिल भारतीय माथाडी ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियन यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू मागणीबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर (१८-०३-२०२६) :**(१) मा.मंत्री (कामगार) यांनी महाराष्ट्र विधानमंडळाच्या सन २०२५ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांमध्ये प्रस्तुत प्रकरणासंदर्भातील निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे.

(२) व (३) होय हे खरे आहे.

या संदर्भात शासनास विविध लोकप्रतिनिधी व कामगार संघटना यांच्याकडून शासनास निवेदने प्राप्त झालेली आहेत. त्या अनुसरुन सदरहू माथाडी कामगार हे जरी माथाडी मंडळामार्फत नोंदीत करण्यात आले असले तरी ते विविध आस्थापनेवर काम करत असून त्यांना माथाडी अधिनियमांतर्गत असलेल्या नोकरीच्या अटी व शर्ती तसेच विविध कल्याणकारी लाभ दिले जातात. त्यांच्या सेवा या शासकीय अथवा निम शासकीय सेवा समजल्या जात नाहीत. त्यामुळे त्यांना सेवानिवृत्ती वेतन देय नाही. त्याऐवजी त्यांना भविष्य निर्वाह निधीची संपूर्ण रक्कम अदा केली जाते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## गोंडपिपरी (जि.चंद्रपूर) तालुक्यातील प्रादेशिक पाणीपुरठा योजना दुरस्तीस निधी उपलब्ध करुन देणेबाबत

**(२४) ८०४७ (३०-०७-२०२५). श्री.देवराव भोंगळे (राजूरा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंडपिपरी (जि.चंद्रपूर) तालुक्यातील प्रादेशिक पाणीपुरवठा योजना दुरस्तीसाठी शासन स्तरावरून निधी उपलब्ध करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (राजूरा) यांनी दिनांक २५ मार्च, २०२५ रोजी वा

त्यासुमारास मा.पाणीपुरवठा मंत्री यांना निवेदन देऊन मागणी केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (०२-०३-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अंमलबजावणी यंत्रणांकडून प्रादेशिक नळ योजना विशेष दुरुस्तीची अंदाजपत्रके मागविण्यात आली आहेत. अंदाजपत्रके पडताळणीची कार्यवाही सुरु असून जिल्हा वार्षिक योजना सन २०२५-२६ अंतर्गत तांत्रिक मान्यतेसह, जिल्हा नियोजन समितीकडे निधीची मागणी करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर शहरातील विविध उद्योगांत सुरु असलेली बालमजुरी रोखण्याबाबत

**(२५) ८१३४ (१९-०९-२०२५). श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील आणि अन्य राज्यातील बारा ते चौदा वर्षाच्या मुलांना चांगले शिक्षण आणि रोजगाराचे आमिष दाखवून नागपूर शहरात आणून त्यांना मोलमजुरीच्या कामात जुंपवून ठेवणारी दलालांची टोळी सक्रिय असल्याची गंभीर बाब माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्याअनुषंगाने सदर शहरातील विविध आस्थापनांत, उपहारगृहे आणि उद्योगधंद्यात कार्यरत असलेल्या बालमजुरांची शोधमोहीम राबविण्यासह, कायद्याचे उल्लंघन करून बालमजुरांना कामावर ठेवणाऱ्या संबंधितांवर कठोर कारवाई करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर (१७-०३-२०२६) :** (१) हे खरे आहे.
(२) नागपूर रेल्वे स्टेशन येथे काही मुले रडत असल्याचे आढळून आल्यावर चौकशी केली असता ठेकेदार श्री. प्रमोदप्रेमी वल्द गया यादव यांनी ०९ बालकामगार कामासाठी आणल्याचे निदर्शनास आले. दिनांक १४/११/२०२४ रोजी नागपूर रेल्वे पोलिस स्टेशन येथे दिलेल्या फिर्यादीवरुन पोलिसांनी भारतीय न्याय संहिता आणि बालकामगार (प्रतिबंध आणि विनियमन), अधिनियम १९८६ अन्वये ठेकेदाराविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

माहे जानेवारी, २०२४ ते ऑक्टोबर, २०२५ या कालावधीत नागपूर परिसरात धाडसत्रांचे आयोजन करण्यात येऊन १७ आस्थापनांची तपासणी करण्यात आली. त्यामध्ये ०७ बालकामगार व २३ किशोरवयीन कामगारांना मुक्त करण्यात आले व त्यांच्या नियोक्त्यांविरुध्द संबंधीत पोलीस स्टेशनमध्ये १६ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच बाल कामगार अधिनियमांतर्गत १० खटले दाखल करण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## माळेगाव व मुसळगाव (ता.सिन्नर, जि.नाशिक) येथील औद्योगिक वसाहतीत कंपन्यांची कर वसूली होत नसल्याबाबत

**(२६) ८१६१ (२९-०९-२०२५). श्रीमती सरोज अहिरे (देवळाली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माळेगाव व मुसळगाव (ता.सिन्नर, जि.नाशिक) येथील औद्योगिक वसाहतीत कार्यरत असलेल्या कंपन्यांकडे सन २००१ पासून कोटयवधी रुपयांची कर वसुली बाकी असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांच्याकडे वारंवार लेखी निवेदने करुनही कर वसूली होत नसल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांनी चौकशीचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या औद्योगिक वसाहतीत एकूण किती उद्योग आहेत व त्यापैकी किती उद्योजकांनी सन २००१ पासून कर रक्कम अद्याप भरलेली नसल्याचे निदर्शनास आले आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार उद्योजकांकडून थकीत कर वसुली करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे (१०-०३-२०२६) :** (१) अंशत : खरे आहे .

(२) होय,

श्री.संतोष शर्मा यांनी दिनांक ०२/०६/२०२५ रोजी माळेगाव व मुसळगाव मधील कंपन्यांकडून कर वसुली होत नसल्याबाबत तक्रार अर्ज दिला होता. सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यास्तव मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांनी दिनांक ३० जुलै , २०२५ रोजीच्या पत्रान्वये पंचायत समिती, सिन्नर यांना कळविले आहे.

(३) माळेगाव औद्योगिक वसाहतीमध्ये २६० उद्योग आहेत. तेथे सन २००१ पासून कर भरलेला नसल्याची बाब नाही. परंतु, सन २०२२-२३ पासून रु.१.४ कोटी कर थकीत असल्याची बाब आहे. तसेच मुसळगाव येथील कारखान्यांची संख्या ४५३ असून सन २००१ पासून औद्यागिक वसाहतीमध्ये बंद पडलेल्या ५ उद्योगांकडून रु.४३.४९ लक्ष एवढी थकबाकी आहे.

(४) माळेगाव आणि मुसळगाव या दोन्ही ग्रामपंचायतींकडून थकबाकी वसुलीसाठी उद्योगांना बिले व नोटीसा , जप्ती वारंट बजावण्यात आले असून वसुलीची कार्यवाही सुरु आहे. तथापि, अनेक उद्योग बंद असल्याने थकबाकी वसुली करण्यात अडचणी येत आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुरबाड (ता.डहाणू, जि.पालघर) या गावाप्रमाणे राज्यात सर्व ठिकाणी "पॅरोलिसिस प्लांट" स्थापन करणेबाबत

**(२७) ८१६९ (२९-०९-२०२५). श्रीमती सरोज अहिरे (देवळाली), श्री.सचिन पाटील (फलटण), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.विठ्ठल लंघे (नेवासा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील

काय :-

(१) मुरबाड (ता.डहाणू, जि.पालघर) या गावातील एका तरुणाने गाव प्लास्टिकमुक्त करण्यासाठी गावात उत्तम प्रकाराचा प्रयोग करुन लोकसहभागातून एक "पॅरोलिसिस प्लांट" उभा करुन या प्लांटमध्ये प्लास्टिकपासून तेल आणि वायू तयार केले जाणार असल्याचे दिनांक २५ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामध्ये शाळकरी मुलांच्या सहभागातून क्लीन-अप ड्राइव्ह घेऊन प्लास्टिक संकलन, विलगीकरणाचे काम सुरु केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गाव हे देशातील पहिले लोकसहभागातून चालणारे पॅरोलिसिस प्लांट असून इतर गावांमध्ये व राज्यातील अन्य ठिकाणी उक्त प्लांट सुरु करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (११-०३-२०२६) :** (१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार, हे खरे आहे.

(२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार, हे खरे आहे.

(३) स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा २ अंतर्गत प्रत्येक तालुक्यामध्ये १ प्लास्टीक कचरा व्यवस्थापन युनिट स्थापन करण्याकरिता रु.१६.०० लक्षपर्यंत अनुदान अनुज्ञेय आहे. त्यानुसार राज्यात प्लास्टीक कचरा व्यवस्थापन केंद्र उभारण्यात येत आहे. जिल्हा परिषद पालघर, यांच्याकडून प्राप्त माहितीनुसार सद्य:स्थितीत डहाणू तालुक्यातील इतर ग्रामपंचयातीमध्ये सदर उपक्रम ग्रामपंचयातीचा १५ वा वित्त आयोग निधी व CSR निधीतून सुरु करण्यासाठीचे प्रयत्न चालु आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## परभणी जिल्ह्यातील मानवत-आंबेगाव रस्त्याच्या कामाला दिलेली मुदत संपूनही काम प्रलंबित असल्याबाबत

**(२८) ८२६९ (२५-०८-२०२५). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानवत-आंबेगाव (जि.परभणी) या सहा किलोमिटर रस्त्याच्या कामासाठी शासनाने रुपये ४ कोटी ४१ लाख ८४ हजार रुपयांचा निधी मंजूर करुन सदर रस्त्याचे काम दिनांक ८ ऑक्टोबर, २०२४ रोजी पर्यंत पूर्ण करण्यासाठीचा कालावधी देण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रस्त्याच्या कामासाठी देण्यात आलेली मुदत संपुर्ण ५ महिन्याचा कालावधी उलटून गेला तरीही संबंधित ठेकेदाराकडून केवळ रस्ता मजबुतीकरण व पुलाचे काम करण्यात आले असून उर्वरित काम प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अर्धवट रस्त्याच्या कामामुळे ठिकठिकाणी खडी उखडल्याने वाहनधारक, शेतकऱ्यांना अनेक अडचणींचा सामाना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वेळेत काम पूर्ण न करणाऱ्या संबंधित दोषी ठेकेदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे (२०-०२-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत:, खरे आहे. तथापि, सदर कामास जमीन वादामुळे दिनांक ३०/६/२०२५ पर्यंत सक्षम अधिकारी यांनी मुदतवाढ मंजूर केली आहे.

(३) अंशत:, खरे आहे. तथापि, रस्ता वाहतुकीस सुरु सुरळीत आहे.

(४) संबधित ठेकेदारास वेळोवेळी काम पूर्ण करणेबाबत नोटीसद्वारे सूचित करण्यात आलेले आहे. काम वेळेत पूर्ण होत नसल्याने संबधित ठेकेदारास दिनांक ०९/११/२०२४ पासुन रु.४,२६,०००/- रुपये प्रती आठवडा दंड लावण्यात आला असून आतापर्यंत रु.४२,६०,०००/- एवढा दंड वसूल करण्यात आला आहे. सदर काम माहे मार्च, २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

## पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रमाचे (पीएमईजीपी) बंद पडलेले संकेतस्थळ सुरु करणेबाबत

**(२९) ८४३१ (१९-०९-२०२५). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम या योजनेची खादी व ग्रामोद्योग आयोग आणि महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग महामंडळांकडून अंमलबजावणी करण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेचे सर्व काम हे संकेतस्थळाच्या माध्यमातून ऑनलाईन करण्यात येत असून सुधारणा, दुरुस्ती करण्याच्या नावाखाली सदर संकेतस्थळ दिनांक १५ मार्च, २०२५ रोजी पासून बंद असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याबाबत संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांन केंद्रीय सुक्ष्म आणि लघू उद्योग मंत्रालयातून चौकशी केली असता उक्त संकेतस्थळ कधी सुरु होणार याची त्यांना माहिती नसल्याचे सांगण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर बँकांकडून कर्ज मंजुरीची प्रक्रिया ही माहे मार्च, २०२५ अखेरीस केली जाते मात्र संकेतस्थळ बंद असल्याने कृषी व्यावसायिकांना याचा मोठा फटका बसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्याअनुषंगाने पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रमाचे (पीएमईजीपी) बंद असलेल्या संकेतस्थळाचे काम तातडीने सुरु करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (२४-०३-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम ही योजना केंद्र शासनाच्या सूक्ष्म, लघु, मध्यम मंत्रालयाकडून दिनांक १५/०८/२००८ पासून राबविण्यात येत असून खादी व ग्रामोद्योग आयोग ही संस्था नोडल एजन्सी म्हणून काम करत आहे. तसेच राज्य शासनाच्या जिल्हा उद्योग केंद्र आणि महाराष्ट्र खादी व ग्रामोद्योग मंडळ यांच्यामार्फत सदर योजनेची राज्यामध्ये अंमलबजावणी करण्यात येत आहे.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

सन २०१६ पासून सदर योजनेची अंमलबजावणी संकेतस्थळाच्या माध्यमातून ऑनलाईन पोर्टलद्वारे करण्यात येत असून सदर संकेतस्थळ नियमित सुरू होते. तथापि, प्रलंबित अर्जाचा अनुशेष असल्याने नवीन अर्ज स्वीकारण्याची प्रक्रिया दिनांक १५/०४/२०२५ रोजी पासून तात्पुरती स्थगित करण्यात आली होती.

(३) सदरहू संकेतस्थळ तातडीने सुरू करणेबाबत उद्योग संचालनालयामार्फत खादी व ग्रामोद्योग आयोग या नोडल एजन्सीकडे विनंती करण्यात आलेली होती. त्यानुसार नवीन अर्ज स्वीकारण्याची प्रक्रिया दिनांक २३/०६/२०२५ रोजी पासून सुरू केलेली आहे.

(४) पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेच्या नोडल एजन्सीने कळविल्यानुसार, प्रलंबित अर्जाचा अनुशेष असल्याने नवीन अर्ज स्वीकारण्याची प्रक्रिया दिनांक १५/०४/२०२५ रोजी पासून तात्पुरती स्थगित करण्यात आली होती. सदर प्रक्रिया दिनांक २३/०६/२०२५ रोजी पासून पुन्हा सुरू करण्यात आली आहे. सन २०२५-२६ मध्ये दिनांक ०५/०३/२०२६ पर्यंत सदर योजनेंतर्गत एकूण १४,२८९ अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी २११५ अर्जांना बँकांकडून मंजूरी देण्यात आली आहे.

(५) सदरहू संकेतस्थळ तातडीने सुरू करणेबाबत उद्योग संचालनालयामार्फत खादी व ग्रामोद्योग आयोग या नोडल एजन्सीकडे विनंती करण्यात आलेली होती. त्यानुसार नवीन अर्ज स्वीकारण्याची प्रक्रिया दिनांक २३/०६/२०२५ पासून सुरू केलेली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पावसाच्या पाण्याचे संकलन (Rainwater Harvesting) व भूगर्भ जल पुनर्भरण (Groundwater Recharge) बाबत

**(३०) १००९२ (३०-०७-२०२५). श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पावसाच्या पाण्याचे संकलन (Rainwater Harvesting) व भूगर्भ जल पुर्नभरण (Groundwater Recharge) बाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत,

(२) असल्यास, याबाबत शासनाने जिल्ह्यांना कोणते निर्देश दिलेले आहेत काय,

(३) असल्यास, गेल्या तीन वर्षांमध्ये दुष्काळग्रस्त भागात शासनाकडून किती टँकर पाठविण्यात आले आणि तातडीच्या पाणीपुरवठ्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात आल्या आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (२४-०३-२०२६) :**(१) पावसाच्या पाण्याचे संकलन (Rainwater Harvesting) व भूगर्भ जल पुनर्भरण (Groundwater Recharge) यासाठी को.प.बंधारे, साठवण बंधारे, गेटेड सिमेंट बंधारे आणि पाझर तलावांची नविन कामे/दुरुस्ती/नूतनीकरण कामे राबविण्यात येत आहेत. प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना (PMKSY) २.० (केंद्र शासन पुरस्कृत योजना), जलयुक्त शिवार अभियान २.०, गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार आणि नाला खोलीकरण व रुंदीकरण या योजना राबविण्यात येतात. जलशक्ती अभियान व अमृत सरोवर या केंद्रशासित पुरस्कृत योजनांची अंमलबजावणी करण्यात येते.

(२) पर्जन्यमान, भूगर्भ जलपातळी व दुष्काळाची तीव्रता लक्षात घेऊन जलसंधारण कामांना प्राधान्य देऊन व कामांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या सूचना क्षेत्रिय कार्यालयांना देण्यात आल्या आहेत. तसेच

प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना (PMKSY) २.० (केंद्र शासन पुरस्कृत योजना), जलयुक्त शिवार अभियान २.०, गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार आणि नाला खोलीकरण व रुंदीकरण, जलशक्ती अभियान व अमृत सरोवर या योजनांबाबत वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेले शासन निर्णय, परिपत्रक व आढावा बैठकीतील निर्देशानुसार अंमलबजावणी करण्यात येते.
(३) मागील ३ वर्षामध्ये महसूल व वन विभागाने शासन निर्णय दिनांक ३१/१०/२०२३ अन्वये सन २०२३ च्या खरीप हंगामामध्ये राज्यातील ४० तालुक्यामध्ये दुष्काळ घोषित केला होता. त्यानुसार सदर जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त तालुक्यात माहे ऑक्टोबर, २०२३ ते जून, २०२४ या टंचाई कालावधीत एकूण ४८०२ टँकर पाणी पुरवठा करण्यात आला आहे. तसेच सदर कालावधीमध्ये तातडीच्या पाणी पुरवठ्यासाठी पिण्याच्या पाण्याच्या टंचाईच्या निवारणार्थ असलेल्या खाजगी विहीर अधिग्रहण, नवीन विंधन विहीर घेणे, नळ पाणी पुरवठा योजनांची विशेष दुरुस्ती अशा उपाययोजना शासनाकडून राबविण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बाळापूर (जि. अकोला ) विधान सभा मतदार संघातील बेघर नागरिक शासकीय जमिनीवर अतिक्रमण करून रहात असल्याबाबत

**(३१) १०२३७ (३०-०७-२०२५). श्री.नितीन भिकनराव देशमुख (बाळापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बाळापूर (जि. अकोला ) विधान सभा मतदार संघातर्गत किती बेघर नागरिक (गावनिहाय) ग्रामीण भागातील शासकीय जमिनीवर अतिक्रमण करून राहत आहेत,
(२) असल्यास, शासन निर्णय क्र. प्रआयो २०१९/प्रक१०/योजना १० दिनांक ९/९/२०१९ नुसार वरील नागरिकांच्या (गाव निहाय) जागा नियमानुकुल करणेबाबत जिल्हा स्तरावर किती सभा घेण्यात आल्या, किती प्रस्ताव प्राप्त झाले व किती जागा नियमानुकूल करण्यात आल्या आहेत,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन या प्राप्त प्रस्तावांपैकी किती प्रस्ताव प्रलंबित आहेत, किती प्रस्ताव अद्यापी जिल्हा स्तरावरील समितीसमोर ठेवण्यात आले नाहीत याप्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे (०१-०३-२०२६) :** (१) बाळापुर विधानसभा मतदार संघांतर्गत बाळापूर तालुक्यातील एकूण ६६ ग्रामपंचायतीमध्ये १०९५, पातूर तालुक्यातील एकूण ५७ ग्रामपंचायतीमध्ये २५७८ व अकोला तालुक्यामध्ये २३ ग्रामपंचायतीमधील २४९  नागरीक शासकीय जमिनीवर अतिक्रमण करुन राहत आहेत.
(२) शासन निर्णयानुसार बाळापुर तालुक्यामध्ये जागा नियमानुकूल करणेबाबत सन २०१८ ते सन २०२५ पर्यंत तालुकास्तरावर एकुण १२ सभा घेण्यात आल्या असून ७०२ प्रस्ताव प्राप्त झाले असून त्यापैकी ६८० प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली आहे. पातुर तालुकास्तरावर एकूण २१ सभा घेण्यात आल्या असून ११३२ प्रस्तावांपैकी एकूण ९५३ प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली आहे. अकोला तालुक्यामध्ये ७ सभा घेण्यात आल्या असुन १०९ प्रस्तावापैकी १०९ प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली आहे.

(३) बाळापुर तालुक्यातील त्रुटी अभावी प्रलंबीत ०५ प्रस्तावांत पुर्तता करण्याबाबत कळविण्यात आले आहे. तसेच, सदर तालुक्यातील उर्वरीत २२ प्रस्ताव व पातुर तालुक्यातील उर्वरीत १७९ प्रस्ताव हे ई वर्ग जमीनीवरील अतिक्रमण असून, मा. न्यायालयाचे आदेशानूसार ई वर्ग क्षेत्रावरील कुटुंबांचे प्रस्ताव नियमानुकूल करणेबाबत स्थगीती असल्याने प्रलंबीत आहेत. त्यामुळे उपरोक्त प्रलंबीत प्रस्ताव शक्ती प्रदत्त समितीसमोर ठेवण्यात आलेले नाहीत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**डेब्रामाळ (ता. अक्कलकुवा, जि. नंदुरबार) येथील माजी सरपंच यांनी ग्रामपंचायतीमध्ये केलेल्या अपहारबाबत**

**(३२) १०२६६ (२९-०९-२०२५). श्री.आमश्या पाडवी (अक्कलकुवा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डेब्रामाळ (ता. अक्कलकुवा, जि. नंदुरबार) या ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या कंजाला व पलासखोब्रा या गावात सुमारे ३५ वर्षापासून माजी सरपंच श्री.रामसिंग दुधल्या वळवी यांनी एकतर्फी सत्ता स्थापन करून सत्तेचा दुरुपयोग केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एक हाती कारभार करणारे श्री.रामसिंग वळवी यांनी पेसा कायदयाचा व ग्रामकोष निधीची अंमलबजावणी सन २०१४ पासून केली नाही तसेच त्यांनी अनुसूचित गावातील ग्रामसभेच्या कामासंबंधित असणाऱ्या नोंदवह्या न ठेवता ग्रामसभा न भरवता तसेच ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थांना विश्वासात न घेता मनमानी कारभार करून निधी हडप केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ग्रामपंचायत सार्वजनिक निवडणूक कार्यक्रम दिनांक १७/१२/२०२२ रोजी वा त्यासुमारास जाहीर झाला असताना व आदर्श आचारसंहिता लागू असताना श्री.वळवी यांनी त्यांच्या मुलाच्या नावाने दिनांक १३/०६/२०२३ रोजी वा त्यासुमारास "याहागुंदारी बाहागोऱ्या वंदन" या बचत गटाच्या नावे रक्कम वर्ग करून घेतली, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच, १३ व्या वित्त आयोगाच्या निधीचा दुरुपयोग करून दफ्तर हस्तांतरण न केलेली कामे करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार माजी सरपंच श्री.वळवी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे (२४-०२-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे.
१४ वर्ष सरपंच व ०८ वर्ष ग्रामसभा कोष समिती कंजालाचे अध्यक्ष म्हणून कार्यरत होते.
(२) अंशत: खरे आहे.
पैसा ५% निधी सन २०१५ पासून प्राप्त झाला आहे व १० नोंदवह्या पैकी चार नोंदवह्या ठेवल्या नाहीत.
(३) हे खरे आहे.
(४) खरे नाही.
(५) होय.

अनियमितता झालेल्या/ जादा खर्चाच्या रक्कमा सर्व संबंधीताकडून वसूल करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ग्रामीण गृहनिर्माण योजना अंतर्गत कार्यरत राज्य, विभाग, जिल्हा प्रोग्रामर व संगणक परिचालकांना मानधन प्रदान करणेसह इतर मागण्या पूर्ण करणेबाबत**

**(३३) १०२९६ (२९-०९-२०२५). श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (परतूर), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामीण गृहनिर्माण योजना ही शासनाची अत्यंत महत्त्वाची व लक्षवेधी योजना असून सदर योजनेंतर्गत राज्य, विभाग, जिल्हा, तालुकास्तरावर कंत्राटी तत्वावर अनेकांची नियुक्ती केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजनेंअतर्गत करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील ग्रामपंचायतींमध्ये मागील १४ वर्षांपासून सेवा देणाऱ्या संगणक परिचालकांना माहे ऑक्टोबर, २०२४ पासूनचे थकित मानधन प्रदान करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. ग्रामविकास मंत्री यांना दिनांक १५ मार्च, २०२५ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य व केंद्र सरकार पुरस्कृत योजनांची सर्व कामे सदरील गट करीत असून त्यांना अदयाप पर्यंत वेळेवर मानधनही न दिले जाणे तसेच हे कर्मचारी तुटपुंज्या मानधनावर वर्षानुवर्ष काम करत असून काही दिवसांपूर्वी ५ टक्के वेतनवाढ देण्यात आली असली तरी अदयापी त्याची अतिरिक्त देयके मिळालेली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सर्व कर्मचाऱ्यांचा अनुभव व वय बघता त्यांना ५८ वर्षे वयापर्यंत नोकरीची हमी ( जॉब सेक्युरिटी) मिळणे आवश्यक आहे. तसेच ग्रामविकास विभागामार्फत उमेद व इतर विभागांप्रमाणे HR पॉलिसी लागू केल्या आहेत त्या सर्व मागण्या लागू करण्यात याव्यात अशी मागणी कर्मचाऱ्यांची आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या सर्व कर्मचाऱ्यांच्या मूळ मानधनांमध्ये वाढ करुन महिन्याच्या ५ तारखेच्या आत पगार दिला जाणे, तसेच संबंधित संस्थेमार्फत मूळ मानधन व्यतिरिक्त पीएफसह इतर सवलती मिळणे अपेक्षित असताना यांना केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री आवास योजना या एका योजनेतून मानधन दिले जाते, हे ही खरे आहे काय,

(६) तसेच, प्रत्यक्षात काम मात्र केंद्र, राज्य शासनाच्या तब्बल ८ ते ९ योजनांचे करून घेतले जाते त्यानुसार पगार, मानधन देणे आवश्यक असल्याने याबाबतचा शासन निर्णय केव्हा निर्गमित करण्यात येईल, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे (०१-०३-२०२६) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे आहे.

(५) हे खरे नाही.

(६) राज्य, विभाग, जिल्हा व तालुकास्तरावरील सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांची नियुक्ती शासन निर्णय दिनांक १० फेब्रुवारी, २०१६ व दिनांक २७ जून, २०१७ अन्वये केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) व इतर ग्रामीण गृहनिर्माण योजनांची तसेच पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी करण्यात आली आहे. सदर कंत्राटी कर्मचाऱ्यांचे मानधन केंद्र पुरस्कृत व राज्य पुरस्कृत योजनांच्या अंमलबजावणी करीता प्राप्त होणाऱ्या एकत्रित प्रशासकीय निधीमधून अदा करण्यात येते.

---

**पंचायत समिती (जि.बीड) येथे गटविकास अधिकारी यांचा अतिरिक्त कार्यभार काढून घेण्याबाबत**

**(३४) १०६८१ (२१-०७-२०२५). श्री.संदिप क्षीरसागर (बीड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंचायत समिती (जि.बीड) येथे गटविकास अधिकारी हे पद मागील अनेक दिवसांपासून रिक्त असल्याने त्या ठिकाणी सातत्याने प्रभारी गटविकास अधिकारी यांच्याकडे कार्यभार देण्यात येत असून पाटोदा गटविकास अधिकारी यांना उक्त पंचायत समितीचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कुशल निधीवाटपामध्ये पाटोदा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांच्या विरोधात तक्रारी असताना देखील कागदोपत्री चौकशी करुन आर्थिक हितसंबंध सांभाळून तसेच कुशल निधीची शहनिशा न करता माहे एप्रिल, २०२५ मध्ये सदर निधी वितरित केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त गट विकास अधिकारी कोणतीही खातरजमा न करता नरेगामधील सर्व कामांच्या मजुरीची आर्थिक देवाण-घेवाण करीत असून त्यांच्या अनियमिततेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शासनास माहे डिसेंबर, २०२४ व जानेवारी, २०२५ मध्ये वेळोवेळी तक्रारी दिलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने गटविकास अधिकारी यांचा अतिरिक्त कार्यभार कमी करुन इतर नियमित पंचायत समितीच्या अधिकारी यांच्याकडे नियमोचीत पदभार देण्याची मागणी देखील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २१ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास पत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन गटविकास अधिकारी यांचा अतिरिक्त कार्यभार कमी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे (०२-०३-२०२६) :** (१) होय.

गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बीड या पदावर दिनांक २८/०१/२०२५ रोजी पासून नियमित गट विकास अधिकारी कार्यरत नसल्यामुळे दिनांक ०३/०६/२०२५ पर्यंत गट विकास अधिकारी, पाटोदा यांच्याकडे सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आला होता.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही. तथापि, स्थानिक लोकप्रतिनिधीचे या संदर्भात तक्रारीचे निवेदन प्राप्त आहे.

(४) व (५) होय, हे खरे आहे. मा. विधानसभा सदस्य श्री. संदिप क्षीरसागर यांचे निवेदन दिनांक २९ मे, २०२५ अन्वये श्री. पी.एन. वानखेडे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती पाटोदा यांचेकडील गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बीड या पदाचा अतिरिक्त कार्यभार कमी करुन श्रीम. मीना कांबळे, गट विकास अधिकारी पंचायत समिती, गेवराई, जि.प. बीड यांचेकडे दिनांक ०३/०६/२०२५ पासून अतिरिक्त कार्यभार देण्यात आलेला आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**खेड तालुक्यातील ग्रामपंचायीच्या समस्यांबाबत**

**(३५) १११६९ (३०-०७-२०२५). श्री.बाबाजी काळे (खेड आळंदी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खेड तालुक्यामध्ये राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान (RGSA) योजनेची सध्याची स्थिती काय आहे तसेच त्याचा स्थानिक प्रशासनावर व नागरिकांवर कसा परिणाम झाला याबाबत आढावा घेऊन नियोजन करण्यात आले आहे काय,
(२) असल्यास, ग्रामपंचायत विकास योजना (GPDP) पंचायतींना विकासात्मक योजनेअंतर्गत प्रादेशिक नगररचना कायद्यान्वये काही ठोस आधार देऊन आराखडे शाश्वत करण्यावर शासन विचाराधीन आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, खेड तालुक्यामध्ये ग्रामपंचायतींनी पायाभूत सुविधा विकास प्रकल्प हाती घेऊन स्थानिक सुविधांमध्ये सुधारणा करण्यासाठी CSR-उदयोजक सामाजिक जबाबदारी माध्यमातून (corporate social responsibility) माध्यमातून किती निधी उपलब्ध करुन घेण्यात आला आहे,
(४) असल्यास, सदर तालुक्यामध्ये ग्रामपंचायतीच्या निर्णय प्रक्रियेत आणि निधी वापरात पारदर्शकता आणि जबाबदारी सुनिश्चित करण्यासाठी सार्वजनिक-खाजगी भागीदारी किंवा समुदाय-नेतृत्वाखालील उपक्रमांसाठी कोणत्या संधी उपलब्ध करुन दिल्या आहेत
(५) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन त्यानुसार ग्रामपंचायतींमध्ये पाणी, सांडपाणी, घनकचरा, रस्ते पथदिवे आणि आरोग्य या मूलभूत उपाययोजना राबविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे (०९-०३-२०२६) :** (१) राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानांतर्गत प्रशिक्षण कार्यशाळा घेण्यात येतात. वेळोवेळी दिलेल्या प्रशिक्षणामुळे सरपंच, ग्रामपंचायत अधिकारी व कर्मचारी हे शासनाच्या विविध उपक्रम व योजनांप्रती प्रशिक्षित झाले असून त्यांना ग्रामपंचायतीचे स्व:उत्पन्न वाढीस प्रयत्न करणेबाबत प्रशिक्षित करण्यात आले आहे.
(२) ग्रामपंचायत विकास योजना (GPDP) अंतर्गत १५ वा वित्त आयोग निधीतून व राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानांतर्गत ग्रामपंचायतीकडून विकास आराखडे तयार करण्यात येऊन त्यास तालुकास्तरीय तांत्रिक समितीच्या सूचनांनुसार अंतिम मान्यता देणेत येते. प्रादेशिक नगररचना कायद्यान्वये ग्रामपंचायत विकास आराखडे बनविण्यात आलेले नाहीत.
(३) सीएसआर निधीतील विकास कामांचा निधी पंचायत समिती स्तरावर प्राप्त होत नाही.

(४) प्रशिक्षण कार्यशाळेच्या माध्यमातून वेळोवेळी माहिती देऊन जनजागृती करण्यात येते. 'पंचायत निर्णय' ॲप ग्रामसभा व ग्रामपंचायत बैठकांच्या आयोजनात पारदर्शकता वाढवण्यासाठी वापरले जाते. पीएफएमएस द्वारे ग्रामपंचायतींमार्फत विकास कामांची देयके पुरवठादारांना अदा केली जातात. अशाप्रकारे ग्रामपंचायतीच्या निर्णय प्रक्रियेत व निधी वापरात पारदर्शकता आणि जबाबदारी सुनिश्चीत करणेबाबत प्रयत्न करणेत आले आहेत. सार्वजनिक-खाजगी भागीदारी किंवा समुदाय-नेतृत्वाखालील उपक्रमांसाठी संधी उपलब्ध करून देण्यात आलेल्या नाहीत.

(५) १५ वा वित्त आयोग निधी अंतर्गत सदर कामे राबविण्यात येत आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सावनेर (जि.नागपूर) तालुक्यातील घरकुले रेती अभावी प्रलंबित असल्याबाबत

**(३६) ११९०९ (२९-०९-२०२५). डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे इसापूर, गोसेगांव, वलनी, पिपळा (डाकबंगला) वाकी (ता. सावनेर, जि. नागपूर) येथील ७५ ग्रामपंचायतींतर्गत गावांमध्ये पंतप्रधान आवास योजनेंतर्गत अनेक घरकुले रेती अभावी प्रलंबित असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्याअनुषंगाने उक्त घरकुलांची कामे पूर्ण होणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे (०१-०३-२०२६) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील भीक मागणाऱ्या मुलांच्या वाढत्या संख्येबाबत

**(३७) १२२७१ (३०-०७-२०२५). श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.रामदास मसराम (आरमोरी) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील रस्त्यांवर भीक मागणाऱ्या मुलांची संख्या वाढत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या भीक मागणाऱ्या मुलांची संख्या किती आहे त्यापैकी किती मुले अनाथ आहेत तसेच किती मुलांचे पालक आहेत ,

(३) असल्यास, भीक मागणाऱ्या मुलांना या परिस्थिती मधून बाहेर काढत त्यांच्या शिक्षणाची व राहण्याची सोय करणे तसेच त्यांच्या पुनर्वसनासाठी सर्व समावेशक धोरण आखावे अशी सूचना माननीय उच्च न्यायालय, मुंबई यांनी राज्य शासनास माहे मार्च ,२०१६ मध्ये केली आहे, हे ही खरे आहे काय.

(४) असल्यास, राज्यातील भीक मागणाऱ्या मुलांची वाढती संख्येवर उपाय न काढल्यास ही मुले

गुन्हेगारीकडे व व्यसनाधीन होण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असलयास, याबाबत शासनाने माहिती घेऊन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे (२७-०३-२०२६) :** (१), (२), (३), (४) व (५) होय, हे अंशत: खरे आहे,

राज्यातील रस्त्यांवरील बालकांच्या पुर्नवसनासाठी ४३ खुली निवारागृह (Open Shelter) स्वयंसेवी संस्थामार्फत सुरु करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

आपत्कालीन परिस्थितीमध्ये अडकलेल्या बालकांना त्वरित प्रतीसाद देणे आणि दीर्घकालीन सेवाच्या माध्यमातुन बालकांचे सामाजिक पुनर्वसन करण्याच्या उद्देशाने बालकांसाठी १०९८ चाइल्ड हेल्प लाईन सेवा महाराष्ट्र राज्यात १ सप्टेंबर, २०२३ पासून केंद्र शासनाच्या मिशन वात्सल्य योजने अंतर्गत राबविण्यात येत आहे.

रस्त्यावरील मुलांना समाजाच्या व शिक्षणाच्या मूळ प्रवाहात आणून त्यांचे व त्यांचे पुर्नवसन करण्याच्या दृष्टीने सर्वकष योजना म्हणून "फिरते पथक ही योजना राबविण्यास दिनांक १९/०६/२०२५ च्या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात आलेली आहे. सदर योजने अंतर्गत राज्यातील २८ महानगरपालिका क्षेत्रांत प्रत्येकी १ तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये मुंबई शहारासाठी १ मुंबई उपनगर (पूर्व) साठी १ व मुंबई उपनगर (पश्चिम) साठी १ याप्रमाणे एकूण ३१ "फिरते पथक" सुरू करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राजूर (ता.अकोले जि.अहिल्यानगर) येथे काविळ या आजाराने युवतीचा झालेला मृत्यू

**(३८) १२२८७ (२२-०९-२०२५). श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राजूर (ता.अकोले जि.अहिल्यानगर) येथे काविळीची साथ पसरली असून कु.प्रियांका हरिदास शेंडे या युवतीचा काविळीमुळे दिनांक २७ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास मृत्यू झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार काविळीची साथ आटोक्यात आणणे तसेच परिसरातील इतर गावांमध्ये साथ पसरू नये यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर (१३-०१-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

मौजे राजूर ता.अकोले, जि.अहिल्यानगर येथे दिनांक २२/०४/२०२५ पासुन काविळचे रुग्ण आढळून आले होते. तात्काळ साथ नियंत्रण व प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवून रुग्णांवर उपचार सुरु करण्यात आले. उपचारादरम्यान दिनांक २७/०४/२०२५ रोजी कु.प्रियंका हरीदास शेंडे, वय २० वर्षे या युवतीचा मृत्यू झाला आहे.
(२) मौजे राजूर येथे दिनांक २२/०४/२०२५ पासून काविळचे रुग्ण आढळून आल्यानंतर मौजे राजूर येथे

काविळ साथ आटोक्यात आणण्यासाठी उपाययोजना राबविण्यात आल्या. त्याबरोबरच अहिल्यानगर जिल्हयातील सर्व ग्रामपंचायत यांना गटविकास अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी व संबंधित वैद्यकीय अधिकारी यांच्यामार्फत साथरोग प्रतिबंधात्मक उपाययोजना तसेच, साथरोग उद्भवल्यास करावयाच्या उपाययोजना याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच,आरोग्य विभागामार्फत जनजागृती करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लातूर येथील विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालयात यंत्रसामुग्री आणि इतर साहित्यासाठी निधी उपलब्ध करुन देणेबाबत**

**(३९) १२३५६ (०८-०९-२०२५). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर येथील विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालयातील एम.आर.आय. मशीन माहे एप्रिल, २०२३ पासून बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे छातीविकार, मणक्याचे विकार, मेंदूविकार, महिलांच्या ओटीपोटाचे आजार यासह अपघातातील रुग्णांना एमआरआयची आवश्यकता असतानाही त्यांना ही सुविधा उपलब्ध नसल्याने त्यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या रुग्णालयासाठी ३ टेस्ला एम.आर.आय. मशीनची आवश्यकता असून यासाठी प्रशासनाने रु.२६ कोटी इतक्या रुपयांच्या निधीची मागणी केली तसेच, सीएसआर फंडासाठी प्रस्ताव दाखल करूनही अद्याप निधी प्राप्त झाला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त निधी अद्याप उपलब्ध न झाल्यामुळे रुग्णालयाला विवेकानंद धर्मादाय रुग्णालयाशी करार करण्याची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबबात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार रुग्णालयासाठी आवश्यक यंत्रसामुग्री आणि इतर साहित्यासाठी निधी उपलब्ध करुन देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०४-०३-२०२६) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही,

रुग्णांची गैरसोय होऊ नये यासाठी नजीकच्या विवेकानंद धर्मादाय रुग्णालयाशी करार केलेला असून त्यांच्यामार्फत शासनाने ठरविलेल्या दरानुसार रुग्णांची तपासणी करण्यात येत आहे.

(३) हे खरे आहे,

संस्थेमार्फत एम.आर.आय.यंत्रासाठी रुपये २६ कोटीची प्रशासकीय मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव सादर केला होता. तथापि प्रस्तावात त्रूटी असल्याने त्रूटीची पूर्तता अद्याप झालेली नाही. तसेच सी.एस.आर.

फंडासाठी प्रयत्न करुनही अद्याप निधी उपलब्ध झालेला नाही.
(४) हे खरे नाही,
सद्य:स्थितीत विभागाने सन-२०२५-२६ या वित्तीय वर्षात संस्थेतील क्ष-किरणशास्त्र विभागातील एम.आर.आय. मशीन या सार्वजनिक खाजगी भागीदारी (पीपीपी) च्या माध्यमातून मंजूर केले असून सदर यंत्र माहे एप्रिल, २०२६ अखेर पर्यन्त स्थापित होऊन कार्यान्वित होणार आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून सांगली जिल्ह्यातील उद्योगांसाठी वितरित केलेल्या ६६ भूखंडाबाबत**

**(४०) १२३६२ (३०-०७-२०२५). श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून सांगली जिल्ह्यातील उद्योगांसाठी वितरित केलेले ६६ भूखंड परत घेतले आहेत, हे खरे आहे काय,
(२) तसेच, अनेक वर्षे बंद स्थितीत असलेल्या ११४ उद्योगांना नोटीस बजावण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करुन त्याअनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (२८-०१-२०२६) :** (१), (२), व (३) अशंत: खरे आहे.
सांगली जिल्हयातील एकूण १३ औद्योगिक क्षेत्रातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या नियमानुसार विहीत कालावधीत विकसीत न करण्यात आलेले ६६ भुखंड महामंडळाकडून सन २०२१ ते २०२४ या कालावधीत परत घेण्यात आलेले आहेत. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-
शिराळा- २५. अति कडेगांव- १९, शाळगांव बोंबाळेवाडी ७, मिरज १, कुपवाड- १, कडेगांव मिनी- ७, अति पलूस ३, जत १, विटा १ व कवठेमहांकाळ- १ हे आहेत. तसेच सन २०२४ ते २०२५ मध्ये १५ मुखंड परत घेण्यात आले आहेत व ज्या उद्योगांनी विकास कालावधीमध्ये किंवा वाढीव विकास कालावधीमध्ये मुखंड विकसीत केला नाही याची पाहणी करुन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या नियमानुसार नोटीसा देणे व भुखंड परत घेण्याची प्रक्रिया सुरु आहे.
तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या परिपत्रक दिनांक १५/०३/२०२४ अन्वये प्रमुख भुमापक यांच्या अहवालानुसार, बंद स्थितीत असलेल्या ११४ उद्योगांना उद्योग चालू करण्याबाबत नोटीस बजावण्यात आल्या आहेत. त्यापैकी ब-याच उद्योजकांनी उद्योग काही महिन्यात चालू करणार असल्याचे कळविले आहे. त्यानंतर माहे जुलै, २०२५ मध्ये भुखंडाची पाहणी केली असता, बंद असलेल्या सदर उद्योगांपैकी अंदाजीत ३५ उद्योग सुरु झाले आहेत व बरेच उद्योग बँकेकडून कर्ज, वैयक्तीक कारणामुळे बंद असुन चालू करण्याच्या प्रक्रियेमध्ये आहेत. बंद असलेल्या उद्योजकांना उद्योग सुरु करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पिंपरी-चिंचवड शहरात बाल न्याय मंडळ स्थापन करणेबाबत

**(४१) १२३८३ (३०-०७-२०२५). श्री.शंकर जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात बाल न्याय (मुलांची काळजी आणि संरक्षण) कायदा, २०१५ अंतर्गत शासनाच्या वतीने प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी विधीसंघर्ष बालकांसंदर्भात सुनावणीसाठी बाल न्याय मंडळाची स्थापना करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कायद्यानुसार गुन्हेगारी व्यक्त केलेल्या अठरा वर्षाखालील मुलांचा (विधी संघर्षित बालकांना) सहभागी झाल्यानंतर किंवा गुन्हा घडल्यानंतर पोलिसांच्या वतीने बाल न्याय मंडळासमोर हजर केले जाऊन गुन्ह्याच्या चौकशीचे आदेश देताना बाल न्याय कायद्याच्या कलम १२ नुसार मुलाची जामिनावर मुक्तता केली जाताना मूल सराईत गुन्हेगारांच्या संपर्कात येण्याची शक्यता असल्याने अथवा त्याचे मानसिक आरोग्य धोक्यात येणार असल्याने अशा बालकांना त्यांच्या वयोगटानुसार बालनिरीक्षण गृहात पाठवले जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शहरात दिवसेंदिवस बालगुन्हेगारीचे प्रमाण वाढत असून बाल गुन्हेगारीचा चढता आलेख बघता ही एक खूप मोठी सामाजिक समस्या बनत चालली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यात विशेषत: पुणे परिसरात विधीसंघर्ष बालकांवर दाखल गुन्ह्यांचे वाढते प्रमाण लक्षात घेता पुण्यातील बाल न्यायालय मंडळात सुमारे ४९३१ प्रकरणे निकालाअभावी प्रलंबित असून येरवडा येथील एक बाल न्याय मंडळावर कामाचा मोठ्या प्रमाणावर ताण असल्याने गुन्हेगारी कृत्य केलेल्या विधीसंघर्षित बालकांच्या संबंधित प्रलंबित खटले निकाली काढण्यासाठी दिरंगाई होत असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, पुणे व उद्योगनगरी परिसरातील गुन्ह्यात विधीसंघर्षित बालकांचे वाढते प्रमाण लक्षात घेता बालगुन्हेगारी रोखण्यासाठी पुणे जिल्ह्यात उद्योगनगरी पिंपरी-चिंचवड शहरात एक नव्याने बाल न्याय मंडळ स्थापन करण्याची मागणी विधान सभा सदस्य, चिंचवड. यांनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक १२ मे, २०२५ रोजी लेखी पत्राद्वारे मागणी केली आहे , हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, याबबात चौकशी करुन पुणे जिल्ह्यात उद्योगनगरी पिंपरी-चिंचवड शहरात एक अतिरिक्त बाल न्यायालय स्थापन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे (१७-०३-२०२६) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) अंशत: खरे आहे. गृह विभागाकडून प्राप्त माहितीनुसार बाल गुन्हेगारीचे प्रमाण सन २०२४ च्या तुलनेत सन २०२५ मध्ये काही प्रमाणात वाढले आहे. परंतू सन २०२३ च्या तुलनेत सन २०२४ मध्ये हे प्रमाण कमी असल्याचे दिसून येते.

(४) अंशत: खरे आहे. पुणे जिल्ह्यातील बाल गुन्हेगारीची प्रकरणे निकाली काढणेकरीता पुर्वी जिल्ह्यात एक बाल न्याय मंडळ कार्यान्वित होते. तथापि, शासन अधिसुचना दिनांक ३०/०७/२०२५ अन्वये येरवडा, पुणे येथे बाल न्याय मंडळ, पुणे (अतिरिक्त) नव्याने गठीत करण्यात आले आहे.

(५) होय, हे खरे आहे.
(६) सद्य:स्थितीत पुणे जिल्ह्यात दोन बाल न्याय मंडळे कार्यरत आहेत. परंतू, पुणे जिल्ह्यातील बाल न्याय मंडळासमोर प्रलंबित प्रकरणाची संख्या बघता अजून एक नवीन बाल न्याय मंडळ, पुणे गठीत करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

---

**राज्यात जलसंधारणाच्या झालेल्या कामांचे सर्वेक्षण करणेबाबत**

**(४२) १२५१० (१९-०९-२०२५). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सन १९७२ पासून जलसंधारणाच्या झालेल्या सर्व प्रकारांच्या कामांचे सर्वेक्षण करण्याचा निर्णय घेतला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हे सर्वेक्षण कृषी व जलसंधारण विभागाच्या कर्मचाऱ्यामार्फत करणार होते मात्र कृषी सहायकांनी त्यास नकार दिल्याने जलसंधारणाच्या कामांचे सर्वेक्षण ठप्प असल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्याअनुषंगाने उक्त जलसंधारणाची सर्वेक्षण कामे पूर्ण करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (०३-०२-२०२६) :** (१) राज्यात मागील अनेक वर्षांत विविध विभागांच्या विविध योजनांव्दारे करण्यात आलेल्या मृदसंधारण व जलसंधारण संरचनांची प्रत्यक्ष स्थळ पडताळणी (Ground Truthing) करण्याचा निर्णय शासन निर्णय दिनांक १२/०३/२०२५ अन्वये घेण्यात आलेला आहे.
(२) अंशत: खरे आहे. राज्यातील मृदसंधारण व जलसंधारण संरचनांची प्रत्यक्ष स्थळ पडताळणी मृद व जलसंधारण विभाग (राज्यस्तर), मृद व जलसंधारण विभाग (जि.प.ल.पा.), वन विभाग, कृषी विभाग आणि रोजगार हमी योजना विभाग या विभागातील अधिकारी / कर्मचारी करणार होते.

परंतु, पडताळणी करावयाच्या संरचनांपैकी बहुतांश संरचनांचे बांधकाम कृषी विभागाने केलेले असताना, कृषी विभागाच्या कर्मचाऱ्यांनी पडताळणीच्या कामास नकार दिल्याने संरचनांची प्रत्यक्ष स्थळ पडताळणी (Ground Truthing) करण्याचा वेग मंदावला तथापि, सदर कामे इतर कर्मचाऱ्यांकडून करण्यात येत आहे.
(३) कृषी विभागाच्या कर्मचा-यांनी पडताळणीच्या कामाला नकार दिल्याने राज्यातील मृदसंधारण व जलसंधारण संरचनांची प्रत्यक्ष स्थळ पडताळणी मृद व व जलसंधारण विभागातील अधिकारी/ कर्मचारी आणि रोजगार हमी योजनेचे कर्मचारी यांचेमार्फत करण्यात येत असून प्रत्यक्ष स्थळ पडताळणीचे काम प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

## पलूस (जि.सांगली) तालुक्यातील बापूवाडीतील झोपडपट्टी रहिवांशाच्या घराच्या प्रश्नाबाबत

**(४३) १२७०६ (१८-०८-२०२५). श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पलूस (जि.सांगली) तालुक्यातील रेल्वे प्रशासनाने बापूवाडीतील झोपडपट्टी तोडल्यामुळे अनेक कुटुंब बेघर झाल्याचे दिनांक ६ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील झोपडपट्टीतील रहिवाशी शासनाने घरे द्यावी अश्या मागणीसाठी संघर्ष आंदोलन केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन बापूवाडीतील झोपडपट्टीतील रहिवांशाच्या घरांचा प्रश्न सोडविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे (०९-०२-२०२६) :** (१) हे खरे आहे.

(२) पर्यायी जागेत पुनर्वसन व्हावे, यासाठी ठिय्या आंदोलन करण्यात आले आहे.

(३) अतिक्रमण रेल्वे प्रशासनाकडून निष्काषित केल्यानंतर बेघर झालेल्या कुटूंबांना पंचायत समिती पलूस स्तरावरुन प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत एकूण ४३ पैकी ३८ कुटूंबांचा आवास प्लस सर्वेक्षण २०२४ मध्ये समावेश केला आहे. उर्वरित ५ लाभार्थ्यांच्या सन २०२५-२६ साठी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत घरकुलांना मंजूरी देण्यात आलेली आहे. तसेच घरकुलासाठी शासनाच्या प्रचलित नियमानुसार जागा उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

## पूणे शहरातील ससून रुग्णालयातील अतिदक्षता विभागातील खाटांची संख्या वाढविणेसह शहराच्या आजूबाजूला नव्याने रुग्णालये उभारणेबाबत

**(४४) १२७१९ (०८-०९-२०२५). श्री.विजयबापू शिवतारे (पुरंदर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील ससून सर्वोपचार रुग्णालय येथे अतिदक्षता विभागात केवळ १८० खाटा उपलब्ध असल्याने गंभीर आजाराच्या रुग्णांना खाटा मिळवण्यासाठी कित्येक तास प्रतिक्षा करावी लागत असल्याने त्याच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे शहराचा वाढता पसारा, बेसुमार वाढणारी लोकसंख्या, ट्रॅफिकमुळे रुग्णालयात पोहोचण्यास होणारा विलंब आणि सबंध पश्चिम महाराष्ट्रातून येणारे रुग्ण या पार्श्वभूमीवर ससूनच्या धर्तीवर पुणे शहराच्या आजूबाजूला नव्याने रुग्णालये उभारण्यात येणार आहे काय,

(३) असल्यास,याबाबत शासनाने माहिती घेऊन ससून रुग्णालयातील अतिदक्षता विभागातील खाटांची संख्या वाढविणेसह ससूनच्या धर्तीवर पुणे शहराच्या आजूबाजूला नव्याने रुग्णालये उभारणेबाबत कोणती

कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०३-११-२०२५) :** (१), (२) व (३) ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे येथे मंजूर आतररुग्ण खाटांची संख्या ही १२९६ इतकी आहे. येथे दरवर्षी ५.५० लक्ष इतके बाह्यरुग्ण तर ६० हजारांपेक्षा जास्त आंतररुग्ण उपचाराकरीता येत असतात. ससून सर्वोपचार रुग्णालयातील आपत्कालीन विभाग हा २४ तास कार्यरत असतो.

ससून सर्वोपचार रुग्णालयामध्ये एकुण २०६ आयसीयू बेड असून, राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या मानकांपेक्षा जास्त आयसीयू बेड उपलब्ध आहेत. या रुग्णालयातील आयसीयू विभाग हा २४ तास पूर्ण क्षमतेने कार्यरत असतो. या रुग्णालयात पुणे महानगरपालिका तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील संदर्भीत रुग्णांची संख्या जास्त असली तरी उपचारार्थ येणाऱ्या सर्व रुग्णांवर आवश्यक ते उपचार रुग्णालय प्रशासनातर्फे केले जातात. इतर रुग्णालयांमधून संदर्भीत केलेल्या रुग्णांना याच रुग्णालयातील आयसीयूमधील बेड रिक्त होईपर्यंत फक्त प्रतिक्षा यादीमध्ये ठेवावे लागते, त्यामुळे सदर रुग्णांवर पूर्वी भरती असलेल्या रुग्णालयामध्ये उपचार सुरु असतात, त्यामुळे रुग्णाच्या जीवाला धोका निर्माण होत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात व्हेंटीलेटरचा तुटवडा दूर करणेबाबत

**(४५) १२७२९ (३०-०७-२०२५). श्री.विजयबापू शिवतारे (पुरंदर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शासकीय रुग्णालयांमध्ये व्हेंटीलेटरची उपलब्धता न झाल्याने अनेक रुग्णांना व्हेंटीलेटर बेड मिळण्यासाठी प्रतिक्षा करावी लागते. हे खरे आहे काय.
(२) असल्यास, कोरोना कालावधीत राज्यभर कोविड सेंटर उभारून तिथे व्हेंटीलेटर पुरविण्यात आले होते, हे ही खरे आहे काय ,
(३) असल्यास, या काळात संपूर्ण राज्यात किती व्हेंटीलेटर खरेदी करण्यात आले,
(४) असल्यास, कोवीड काळात मोठ्या प्रमाणात व्हेंटीलेटर खरेदी करूनही कोविड संपल्यानंतर व्हेंटीलेटरचा तुटवडा का भासत आहे,
(५) असल्यास, याबाबत शासनाने माहिती घेऊन व्हेंटीलेटरचा तुटवडा दूर करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर (१३-०१-२०२६) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) कोरोना काळात संपूर्ण राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिनस्त असणाऱ्या रुग्णालयांमध्ये विविध स्त्रोतामार्फत ४१४९ इतके व्हेंटीलेटर प्राप्त झाले होते.
(४) हे खरे नाही.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेतून सोने-चांदी गलाई व्यवसायाला लघु उद्योगाचा दर्जा देण्याबाबत

**(४६) १२९८२ (१९-०९-२०२५). श्री.गोपिचंद पडळकर (जत) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेतून सोने-चांदी गलाई व्यवसायाला लघु उद्योगाचा दर्जा देऊन १७ टक्क्यांपर्यंत अनुदान देऊन रुपये एक कोटींपर्यंत कर्ज उपलब्ध करुन देण्याची घोषणा मा.उद्योगमंत्री यांनी विटा (जि.सांगली) येथील मेळाव्यात दिनांक ३० मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, उद्योग विभागाकडून एमआयडीसीच्या क्लस्टर योजनेत सोने-चांदी व्यवसायाला सूक्ष्म अद्योगाचा दर्जा देण्याचीही घोषणा केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, साखर संघाच्या धर्तीवर मुंबईत गलाई व्यवसाय कार्यालये उघडून तेथे गलाई बांधवांना आधार मिळाला पाहिजे, नव्या पिढीसाठी सोने-चांदी व्यवसायातले छोटे-छोटे कोर्स तयार झाले पाहिजे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.उद्योग मंत्री यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले त्यानुसार मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेतून सोने-चांदी गलाई व्यवसायाला लघु उद्योगाचा दर्जा देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (२७-०१-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेच्या दिनांक २१/०५/२०२५ रोजीच्या सुधारित शासन निर्णयानुसार, योजनेंतर्गत पात्र उद्योग/व्यवसायातंर्गत प्रकल्प किंमत कमाल मर्यादा सेवा उद्योग तसेच कृषी पुरक उद्योग व्यवसायांसाठी रुपये ५० लाख व उत्पादन उद्योग प्रकल्पासाठी रुपये १ कोटी करण्यात आली आहे. त्यानुसार सेवा उद्योग तसेच कृषी पुरक उद्योग व्यवसायांकरीता कमाल मार्जिन मनी (देय अनुदान) रुपये ७ लक्ष व उत्पादन उद्योग प्रकल्पाकरीता कमाल मार्जिन मनी (देय अनुदान) रुपये १७.५ लक्ष एवढे राहणार आहे. सदर योजनेंतर्गत सोने-चांदी गलाई उद्योगासाठी उत्पादन व सेवा प्रवर्गांतर्गत लाभ देता येईल.

(२) होय, हे खरे आहे.

उद्योग विभागाकडून राज्य शासनाच्या महाराष्ट्र राज्य औद्योगिक समूह विकास योजना (MSI-CDP) आणि केंद्र शासनाच्या सुक्ष्म, लघु उपक्रम-समुह विकास योजना (MSE- CDP) या योजनेंतर्गत सुक्ष्म व लघु उद्योग समुहांना सामाईक सुविधा केंद्र स्थापन करणेसाठी अनुदान देण्यात येते. सदर बाबतीत गलाई व्यावसायिकांची प्राथमिक बैठक जिल्हा उद्योग केंद्र, सांगली येथे घेण्यात आली आहे.

(३) होय, हे खरे आहे.

उद्योग विभागाकडून उत्पादन व सेवा उद्योगांसाठी विविध योजना राबविल्या जातात. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेअंतर्गत उत्पादन उद्योग तसेच सेवा उद्योग व कृषी पुरक उद्योगांसाठी १५ ते ३५ टक्के अनुदान मंजूर करण्यात येते. तसेच राज्य शासनाच्या महाराष्ट्र राज्य औद्योगिक समूह विकास योजना (MSI-CDP) आणि केंद्र शासनाच्या सुक्ष्म, लघु उपक्रम-समुह विकास योजना (MSE- CDP) या योजना राबविण्यात येत आहे. सदर योजनेंतर्गत छोट्या-छोट्या समुहांना सामाईक सुविधा केंद्र स्थापन

करणेसाठी व व्यावसायिकांच्या कौशल्य विकासासाठी उद्योजकता विकास व तांत्रिक सहाय्य योजनेंतर्गत कौशल्य प्रशिक्षण उपलब्ध करण्यात येते.
(४) मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेअंतर्गत गलाई व्यवसायात लागणारे उपकरणे इत्यादी साठी कर्ज देण्यात येते. गलाई हा प्रक्रीया उद्योग असल्याने त्याला लघु उद्योगाचा दर्जा असून गलाई व्यावसायिक ऑनलाईन उद्यम नोंदणी करू शकतात.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**दारफळ सीना (ता.माढा, जि.सोलापूर) येथील घोरवड्यावरील लघु पाटबंधारे विभागामार्फत बांधण्यात आलेल्या कोल्हापूर बंधा-याचे संरक्षक कठडे निकामी झाल्याबाबत**

**(४७) १३०२२ (१९-०८-२०२५). श्री.अभिजीत पाटील (माढा) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दारफळ सीना (ता.माढा, जि.सोलापूर) येथील घोरवड्यावरील लघु पाटबंधारे विभागामार्फत बांधण्यात आलेल्या कोल्हापूर बंधा-याचे संरक्षक कठडे संपूर्ण निघून गेल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पावसाळ्यापूर्वी सदर बंधा-याला नवीन संरक्षक कठडे आणि दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी दारफळ ग्रामपंचायतीच्यावतीने लघु पाटबंधारे विभाग (मोडबिंन) यांच्याकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (१३-१०-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) ग्रामपंचायतीच्या मागणीच्या अनुषंगाने क्षेत्रिय कार्यालयामार्फत को.प.बंधारा दारफळ सीना या योजनेच्या दुरुस्तीचे अंदाजपत्रक क्षेत्रिय कार्यालयास प्राप्त झाले असून त्याची तांत्रिक तपासणी करुन सदरचे अंदाजपत्रक जिल्हा नियोजन समिती, सोलापूर यांच्याकडे प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी सादर करण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**यवतमाळ जिल्हयात जलसंवर्धनाच्या प्रशासनाकडून ठोस उपाययोजना न केल्याने पाणीटंचाई निर्माण होत असल्याबाबत**

**(४८) १३०४१ (१९-०९-२०२५). श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ जिल्हयात जलसंवर्धनाबाबत प्रशासनाकडून ठोस प्रयत्न न केल्यामुळे पावसाळयात मुबलक पाऊस होऊन देखील उन्हाळात पाणीटंचाई निर्माण होत असल्याचे माहे जून, २०२५ मध्ये निदर्शनास आले

आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जिल्हयात पावसाळयात पावसाच्या पाण्याचे जलसंवर्धन योग्यरित्या होत नसल्यामुळे जलस्त्रोत कमी होत आहेत, हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले तदनुसार सदर जिल्हयात पाणी टंचाई दूर करण्यासाठी जलसंवर्धनाबाबत स्थानिक प्रशासनाकडून कोणत्या विविध उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (०४-०२-२०२६) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) यवतमाळ जिल्ह्यात माहे मार्च, २०२५ पर्यंत जलसंधारणाची १,५११ कामे पूर्ण झालेली आहेत. त्यामुळे यवतमाळ जिल्ह्यात १,५११ योजनांमधून १,९१,१८१ स.घ.मी. पाणीसाठा निर्माण झालेला आहे.

जलस्त्रोतात गाळ साचण्याची प्रक्रीया सतत होत असल्याने काही प्रमाणात साठवण क्षमता कमी होत असते. मात्र त्यासाठी गाळमुक्त धरण व गाळ युक्त शिवार या योजनेअंतर्गत गाळ काढण्याची कामे अशासकीय संस्थेमार्फत करण्यात येत असल्याने साठवण क्षमता पुन:स्थार्पित होत आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील वैद्यकीय महाविद्यलयातील विद्यार्थ्यांना अभ्यासाकरीता डिजिटल टेबल वापरण्याची नवीन संकल्पना मांडण्यात आली असल्याबाबत

**(४९) १३०६२ (३०-०७-२०२५). श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वैद्यकीय क्षेत्रात विद्यार्थ्यांची संख्या वाढत असल्याने महाविद्यालयेही वाढत आहेत मात्र या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना अभ्यास करण्यासाठी देहदान मिळत नसल्याचे माहे मे, २०२५ च्या अखेरीस निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, देहदान उपलब्ध होत नसल्यामुळे अभ्यासाकरीता डिजिटल टेबल वापरण्याची नवीन संकल्पना मांडण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने माहिती घेऊन मानवी देहदान उपलब्ध होण्यासाठी प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार आहे काय,

(४) नसल्यास, त्यामागील कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०२-०३-२०२६) :** (१) होय, हे अंश:त खरे आहे.

राज्यात एकूण ३५ शासकीय वैद्यकीय महाविद्यालये असून, त्यांची एकूण प्रवेश क्षमता ४८५० अशी आहे. राष्ट्रीय आर्युविज्ञान आयोगाच्या (NMC) निकषानुसार १० विद्यार्थ्यांमागे ०१ मानवी देह उपलब्ध असणे आवश्यक आहे. त्यानुसार,एकूण ४८५ शव आवश्यक असून, सद्य:स्थितीत राज्यातील ३५

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये एकूण ३८५ कॅडेव्हर (शव) उपलब्ध आहेत.
(२) विद्यार्थ्यांना अभ्यासाकरीता डिजिटल टेबल वापरण्याची नवीन संकल्पना सद्य:स्थितीत राष्ट्रीय आर्युविज्ञान आयोगाच्या (NMC) निकषामध्ये विहीत केलेली नाही.
(३) संचालनालयामार्फत दिनांक ११.१२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये,पोलीस शल्यचिकित्सक, नागपाडा पोलीस रुग्णालय, मुंबई यांना कॅडेव्हर (शव) उपलब्ध करुन देण्याबाबत विनंती करण्यात आलेली आहे.मानवी देहदान उपलब्ध होण्याकरिता संबंधित वैद्यकीय महाविद्यालयांद्वारे महाराष्ट्र ॲनाटॉमी ॲक्टनुसार स्वतंत्ररित्या संस्थास्तरावर प्रयत्न करण्यात येतात. १८ वर्षांवरील सर्व स्त्रीपुरुष कायद्याने देहदान करु शकतात, त्यानुसार, संबंधित महाविद्यालयाच्या शरीररचनाशास्त्र विभागात देहदान इच्छा पत्र उपलब्ध असते, तसेच नातेवाईकांचे संमतीपत्र आवश्यक असते. त्यानुसार, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय स्तरावर या संदर्भातील आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येतात.
(४) लागू नाही.

---

## पेण (जि. रायगड) तालुक्यातील खारेपाट येथे कायमस्वरूपी पाणी पुरवठा सुरु करण्याबाबत.

**(५०) १३०८४ (१९-०९-२०२५). श्री.रविशेठ पाटील (पेण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पेण (जि. रायगड) तालुक्यातील खारेपाट येथील पाणी टंचाईचा आराखडा तयार करण्यात आला असून १६० वाड्या आणि ३६ गावांना १ कोटी ८९ लाख ५० हजार रुपयांचा पाणीपुरवठा आराखडा तयार करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर आराखडा जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड जिल्हा यांच्याकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आला असून आराखड्यास मंजुरी देण्यात आलेली आहे काय,
(३) असल्यास, सदर १६० वाड्या आणि ३६ गावांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येतो परंतु किती नागरिकांपर्यंत पाणीपुरवठा पोहचतो याची माहिती प्रशासन सादर करणार आहे काय,
(४) असल्यास, टँकरद्वारे पाणीपुरवठा करून पाण्याचा प्रश्न सुटणार नसून येथील नागरिकांना कायस्वरूपी पाणीपुरवठा करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणता ठोस निर्णय घेणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (०५-०२-२०२६) :** (१) हे खरे नाही.
संभाव्य पिण्याचे पाणी टंचाई आराखडा २०२४-२५ अंतर्गत रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यामधील ३६ गावे व १५० वाड्यांचा समावेश आहे. पेण तालुक्यासाठी ९४ लाख ८६ हजार रुपयांचा पाणी पुरवठा आराखडा तयार करण्यात आलेला आहे.
(२) होय.
(३) सद्य:स्थितीत ग्रामपंचायत यांचे मागणीनुसार गटविकास अधिकारी, पंचायत समिती, पेण यांचे मार्फत १२ गावे व ८३ वाड्यांमध्ये दिनांक १७ मार्च, २०२५ पासून ते दिनांक १५ जून, २०२५ पर्यंत १० टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात आलेला आहे. टँकरद्वारे करण्यात आलेल्या पाणीपुरवठ्याचा लाभ ४८,३६४ इतक्या

टंचाईग्रस्त लोकसंख्येने घेतला आहे.
(४) पेण तालुक्यामध्ये पाणीटंचाई निवारणार्थ व कायमस्वरूपी पाणीपुरवठा करणे करीता केंद्र शासन व राज्य शासन यांचे संयुक्त विद्यमाने जल जीवन मिशन अंतर्गत ११३ योजना व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अंतर्गत ३८ गावे व १०८ वाड्यांकरिता शहापाडा प्रादेशिक योजना राबविण्यात येत आहे. जल जीवन मिशन अंतर्गत ५२ योजना पूर्ण झाल्या असून ६१ योजनांची कामे प्रगतीपथावर आहेत. प्रगतीपथावरील योजना पूर्ण करण्याकरीता युद्धपातळीवर कामे सुरू आहेत
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.